रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १८ ◆ अंक ५४

www.ramprahar.com

# राम प्रहर

गुरुवार, ११ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


शेतातील मातीची परीक्षा आता गावातच!/२

पनवेल येथे रस्ते दुरुस्ती कामाला वेग/६

कर्जतमध्ये अघोरी कृत्य, मारहाणीचा निषेध/७


## सुशीला कार्की होणार नेपाळच्या नव्या पंतप्रधान?



**काठमांडू :** नेपाळ गेल्या तीन दिवसांपासून हिंसाचाराच्या आगीत जळत आहे. या हिंसाचारादरम्यान, काठमांडूचे महापौर बालेंद्र शाह नेपाळचे पुढील पंतप्रधान होणार असल्याची चर्चा सुरू झाली, मात्र आता अचानक या शर्यतीत एक नवीन नाव पुढे आले आहे. देशाची सूत्रे कोण हाती घेणार हे ठरवण्यासाठी झेड-एन आंदोलकांनी व्हर्च्युअल बैठक बोलावली होती. या बैठकीत पाच हजारहून अधिक तरुण सहभागी झाले. यातील बहुतांश तरुणांनी माजी मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की यांना सर्वाधिक पाठिंबा दिला आहे. रिपोर्ट्सनुसार बालेंद्र शाह यांना आतापर्यंत झेड-एन आंदोलकांचे नेते मानले जात होते. हजारो तरुणांनी त्यांना देशाची सूत्रे हाती घेण्याचे आवाहन केले, मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळेच आता नेपाळच्या माजी मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की यांचे नाव पुढे आले आहे.

# ओबीसी समाजासाठी विविध निर्णय

## मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा

**मुंबई : प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षणासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची पहिली बैठक बुधवारी (दि.१०) अध्यक्ष तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात मंत्रालयात झाली. या बैठकीला मंत्री छगन भुजबळ, गणेश नाईक, पंकजा मुंडे, संजय राठोड, अतुल सावे, दत्तात्रय भरणे, गुलाबराव पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या वेळी ओबीसी समाजासाठी विविध निर्णय घेण्यात येऊन सांगोपांग चर्चा करण्यात आली.



या संदर्भात उपसमितीचे अध्यक्ष व मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांना माहिती दिली. ओबीसी समाजाच्या कल्याणासाठी प्रलंबित ३८०० कोटी रुपयांचा निधी इतर मागास बहुजन कल्याण मंत्रालयास देण्यात यावा, ओबीसी समाजासाठी प्रस्तावित वसतीगृह व ग्रंथालयांना जागा व निधी उपलब्ध करून द्यावा, केंद्र व राज्य सरकारच्या ओबीसी समाजासाठीच्या विविध योजना सर्वांपर्यंत पोहचण्यासाठी कार्यपद्धती तयार करावी, वित्त विभागाकडे प्रलंबित असलेले ओबीसी समाजाबाबतचे विविध विषय मार्गी लावावे यासह या मंत्रिमंडळ उपसमितीच्या कार्यकक्षेबाबत सविस्तर चर्चा झाली असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या योजनेच्या धर्तीवर ओबीसी समाजातील युवकांना व्यवसाय व रोजगारनिर्मितीमध्ये सहकार्य करण्यासाठी ओबीसी मंत्रालयाने योजना सुरू करावी, असा निर्णय मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीत घेण्यात आला. कोणत्याही चुकीच्या कुणबी नोंदी कोणत्याही समितीने मान्य करू नयेत याविषयी मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीत एकमत झाले असून समाजामध्ये तेढ निर्माण होईल असे वातावरण कुणीही निर्माण करू नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाहीत, असा ठाम विश्वास राज्यातील ओबीसी समाजाचा आणि मंत्रिमंडळ उपसमितीचा आहे, असेही बावनकुळे यांनी या वेळी म्हटले.

मंत्री पंकजा मुंडे आपली भूमिका मांडताना म्हणाल्या की, कोणत्याही सामाजिक मागास जातींच्या समूहात नव्याने एखाद्या जातीचा समावेश करण्याच्या निर्णयाचे सर्वसाधारणपणे कुठेही स्वागत होत नाही, मात्र तरीही ओबीसी समाजाने मोठे मन दाखवले आणि ज्यांच्या कुणबी नोंदी आहेत त्यांना प्रमाणपत्र देण्याला विरोध केलेला नाही, परंतु त्यामध्ये कोणतेही अवैध दाखले दिले जाऊ नयेत आणि सरसकट दाखले देऊ नयेत.



## पालीच्या नगराध्यक्षपदी भाजपचे पराग मेहता; कार्यकर्त्यांचा जल्लोष

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्रांपैकी एक असलेल्या पाली नगरपंचायतीच्या अध्यक्षपद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे पराग मेहता यांनी विजय मिळविला आहे. भाजप कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत, ढोल ताशा वाजवत मोठ्या जल्लोषात विजयोत्सव साजरा केला.

तत्कालीन नगराध्यक्षांचे सदस्यत्व रद्द झाल्यामुळे हे पद रिक्त होते. त्यामुळे बुधवारी (दि. १०) निवडणूक घेण्यात आली. निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार नलिनी म्हात्रे यांनी अर्ज मागे घेऊन भाजपला पाठिंबा दर्शवला, ज्यामुळे राजकीय समीकरणे बदलली.

या निवडणुकीत पीठासीन अधिकारी म्हणून रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी काम पाहिले. पाली नगरपंचायत मुख्याधिकारी माधुरी मडके व इतर पदाधिकारी समवेत उस्थित होते. पाली नगरपंचायतीत एकूण १७ सदस्य असून दोघांचे सदस्यत्व काही दिवसांपूर्वी रद्द झाले आहे. भाजपचे पराग मेहता यांना १५पैकी नऊ मते मिळाली.

पालीचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष पराग मेहता यांची शहरातून वाजत गाजत भव्य विजयी मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सहभागी होत जल्लोष साजरा केला.

दरम्यान, भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे, ज्येष्ठ नेते सतीश धारप, राजेश मपारा, वैकुंठ पाटील, प्रकाश देसाई, नीलिमा पाटील, गीता पालरेचा, अमित घाग आदींनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष पराग मेहता यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी बोलताना खासदार धैर्यशील पाटील म्हणाले की, भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना, रिपाइं महायुतीचे सरकार केंद्रात आणि राज्यात सत्तेत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सक्षम नेतृत्वाचा, विकासात्मक धोरणांचा पुरेपूर फायदा पाली नगरपंचायतीच्या सर्वसामान्य जनतेला होण्यासाठी नगराध्यक्ष पराग मेहता व सहकारी जोमाने काम करतील असा विश्वास आहे. केंद्र व राज्याच्या व्यक्तिगत व सामूहिक लाभांच्या योजना तळागाळातील लाभार्थी घटकाला मिळाव्यात यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.

> *भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, भाजप नेते खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे, ज्येष्ठ नेते सतीश धारप यांच्या मार्गदर्शनाखाली मला नगराध्यक्षपदाची संधी मिळाली. या संधीचे मी सोने करेन. पालीचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी प्रयत्नशील राहीन.*
>
> **–पराग मेहता,** *नवनिर्वाचित नगराध्यक्ष, पाली*

## कामोठ्यातील सबस्टेशनसाठी महावितरणला भूखंडाचा ताबा द्यावा

### आमदार प्रशांत ठाकूर यांची सिडकोकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वीज ग्राहकांना अखंड वीजपुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी कामोठे सेक्टर २५ येथील नवीन सबस्टेशनचे काम लवकरात लवकर सुरू होण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला प्रस्तावित भूखंडाचा ताबा देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्याकडे केली आहे.



माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी कामोठे येथे सबस्टेशन उभारण्याची मागणी केली होती, मात्र कोरोना काळ व इतर तांत्रिक बाबीमुळे हा विषय रेंगाळत राहिला. त्या अनुषंगाने डॉ. भगत यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे विषय मांडला होता. तो मार्गी लावण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे एमडी विजय सिंघल यांना निवेदन दिले. आमदार महेश बालदी, माजी नगरसेवक डॉ. भगत सोबत होते.

या निवेदनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे की, पनवेल, कामोठे या परिसरांतील वाढते नागरीकरण व वाढती लोकसंख्या यामुळे विद्युत पुरवठ्याची वाढती मागणी यावर उपाययोजना म्हणून कामोठे सेक्टर २५, भूखंड क्र.२५ येथे नवीन ३३/११ केव्ही सबस्टेशन उभारण्याचे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतर्फे ठरविले होते व त्याप्रमाणे गेली काही वर्षे त्यांच्यामार्फत संबंधित भूखंड ताब्यात मिळण्याकरिता सिडकोकडे प्रयत्न चालू होते. (पान २ वर..)

## जंजिरा किल्ला २ ऑक्टोबरला होणार खुला

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडमधील जंजिरा किल्ला येत्या २ ऑक्टोबरला खुला होणार असल्याची माहिती पुरातत्व खात्याचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी दिली.

जंजिरा किल्ला पावसाळी हंगामात १ जून ते ३१ ऑगस्टदरम्यान पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात येतो आणि त्यानंतर पुन्हा खुला केला जातो. त्यानुसार पुरातत्व खात्याकडून किल्ल्यात साफसफाईची कामे हाती घेण्यात आली आहेत.

## निवडक

### नेपाळनंतर फ्रान्समध्ये राडा, आंदोलक रस्त्यावर

**पॅरिस :** नेपाळसारखीच स्थिती फ्रान्समध्येही उद्भवली आहे. राष्ट्रपती इमॅनुएल मॅक्रो यांनी पंतप्रधान सेबास्टियन लेकोर्नू यांची नियुक्ती केल्यानंतर बुधवारी (दि.१०) सकाळी राजधानी पॅरिस व इतर शहरात आंदोलक रस्त्यावर उतरले. सरकारने पोलिसांचा फौजफाटा तैनात केला आहे.

### नवे उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांचा शुक्रवारी शपथविधी

**नवी दिल्ली :** देशाचे नवे उपराष्ट्रपती म्हणून सी.पी. राधाकृष्णन यांचा शपथविधी १२ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजून ५ मिनिटांनी होईल, अशी माहिती समोर आली आहे. दरम्यान, ते महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा राजीनामा देणार आहेत. यामुळे महाराष्ट्राचे नवे राज्यपाल कोण होणार याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नो पीयूसी... नो फ्युएल उपक्रम प्रभावीपणे राबवा!

### परिवहनमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**



भविष्यातील पिढीला प्रदूषणमुक्त पर्यावरण देण्यासाठी सध्याच्या पिढीने स्वतःवर पर्यावरणपूरक काही निर्बंध घालून घेणे गरजेचे आहे. त्या उद्देशाने प्रत्येक वाहनाला दिले जाणारे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) हे वैध असणे गरजेचे आहे. अवैध प्रमाणपत्र निर्मितीची साखळी पूर्णतः बंद झाली पाहिजे, यासाठी भविष्यात प्रत्येक पेट्रोल पंपावर 'नो पीयूसी नो फ्युएल' उपक्रमाची अंमलबजावणी सक्तीने करण्यात यावी, असे निर्देश परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहे. परिवहन आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीला परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सहसचिव (परिवहन) राजेंद्र होळकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्यातील प्रत्येक पेट्रोल पंपावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे इंधन भरण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक वाहनाचा वाहन क्रमांक तपासला (स्कॅन करून) जाईल, जेणेकरून त्या माध्यमातून संबंधित वाहनाचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राची वैधता कळेल. जर त्या वाहनाचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र वैध नसेल, तर त्या वाहनाला इंधन दिले जाणार नाही. (पान २ वर..)

## परदेशातील उद्योगांना कुशल मनुष्यबळ पुरवण्यात महाराष्ट्र अग्रेसर राहील : मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

परदेशातील उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन त्यानुसार अभ्यासक्रमांचा प्रशिक्षणात समावेश करावा. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाबरोबरच खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठीही एक सक्षम यंत्रणा तयार करण्यात यावी. आयटीआयमार्फत राबविण्यात येणारे अल्पकालीन अभ्यासक्रम अधिक प्रभावीपणे राबवा. प्रशासनमार्फत केलेल्या सर्व सामंजस्य करारांचा आढावा सीएम डॅशबोर्डवर घेण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



सह्याद्री अतिथीगृह येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा, विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, आयुक्त लहूराज माळी, व्यवसाय व शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, परदेशात आज कुशल मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेऊन या विभागाने काळानुरूप अभ्यासक्रम सुरू करावेत. रोजगार वाढीसाठी करण्यात आलेल्या सामंजस्य कराराची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम यंत्रणा तयार करावी. एखाद्या व्यक्तीने कौशल्य अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापासून ते अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंतची सर्व माहिती डिजिटली पद्धतीने तपासली जावी. शासकीय आयटीआय जागतिक दर्जाच्या कौशल्य केंद्रात रूपांतरीत करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्या. 'मित्रा' संस्थेकडूनही मार्गदर्शन घेण्यात यावे. या वेळी महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा कंपनीसोबत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने विविध प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार केला.

## नवरात्रोत्सवासाठी मूर्तिकारांची लगबग



**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्ह्यात सध्या गौरा गणेशोत्सवाची धूम सुरू आहे. यानंतर पुढे नवरात्रोत्सव आहे. २२ सप्टेंबर रोजी घटस्थापना होणार असून नऊ दिवस देवी विविध रूपात विराजमान होणार आहेत. यासाठी मूर्तीशाळेतही कारागिरांची लगबग वाढल्याचे दिसून येत आहे.

येत्या काही दिवसांत नवरात्रोत्सवाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे शहरातील अनेक भागात देवीच्या मूर्ती बनवण्याचे काम सुरू असून या मूर्ती लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कारागीर अधिक मेहनत घेत आहेत. त्यात पनवेल परिसरातील कार्यशाळेतील मूर्तिकार देवीच्या मूर्तीची रंगरंगोटी करण्यात व्यस्त दिसत आहेत.

गणेशोत्सवानंतर फार कमी अवधीत देवीच्या मूर्ती घडवायची असते. देवी हे स्त्री रूप असल्याने डोळे, चेहरा, हास्य आदी कामे मूर्तिकारांना बारकाईने करावी लागतात. त्यानुसार सध्या देवीच्या मूर्तींना कृत्रिम पापण्या लावण्याचे तसेच हिऱ्याची सजावट कारागीर करीत आहेत.

घरगुती देवी मूर्ती तयार झाल्या असून सध्या मोठ्या मूर्तीचे काम अंतिम टप्प्यात आहे. साधारण आठ इंचापासून १२ फुटांपर्यंत मूर्ती साकारण्यात येत आहेत. यामध्ये सप्तशृंगी, दुर्गा, रेणुका, महालक्ष्मी, कालिकादेवी, महिषासुरमर्दिनी, माँ वैष्णवदेवी, भवानी, एकवीरा माता यांचा समावेश आहे. दुर्गामातेच्या मूर्तीला सर्वाधिक मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले आहे.

यंदा मूर्तीच्या किमतीत २० ते २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. याशिवाय मूर्ती तयार करण्यासाठी लागणारे प्लास्टर ऑफ पॅरिस, रंग, नारळाचा काथ्या, मजुरी आदींमध्ये वाढ झाल्याने यंदा मूर्तीचे भावही वाढले आहेत. तरीही मोठ्या हौसेने नवरात्रोत्सव मंडळ व भाविकांकडून बुकिंग झाली आहे.

## रायगड जिल्ह्यात मान्सूनदरम्यान ३६६ घरांचे नुकसान; तिघांचा मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

यंदा मान्सूनच्या मोसमात रायगड जिल्ह्यात आतापर्यंत ३६६ घरांचे नुकसान झाले. पावसाने तीन जणांचा बळी घेतला. ७२ गोठ्यांचे नुकसान झाले, तर १२ सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान झाले आहे.

यंदाच्या पावसाळ्यात २५५ पक्क्या घरांचे अंशतः नुकसान झाले, तर चार पक्की घरे पूर्णतः कोसळली. ९६ कच्च्या घरांचे अशंतः नुकसान झाले. ११ कच्ची घरे पूर्णतः कोसळली. पाच झोपड्यांचे नुकसान झाले. ७२ गोठे कोसळले. एक पोल्ट्रीचे नुकसान झाले. तळा तालुक्यात एका देवळाचे अंशतः नुकसान झाले. महाड तालुक्यात भेलोशी येथील जिल्हा परिषद शाळेचे नुकसान झाले. याशिवाय एक मंदिर, विहीर, स्मशानभूमीचे अंशतः नुकसान झाले तसेच एका ठिकाणी तलावाची भिंत कोसळली. पोलादपूमध्ये सभागृहाचे नुकसान झाले. रोहा येथील भातकेंद्राचे नुकसान झाले. मुरूडमध्ये मराठी शाळेचा काही भाग कोसळला. अलिबाग तालुक्यात स्मशानभूमीचे अंशतः नुकसान झाले.

महाड तालुक्यातील शिंगरकोंड येथील सुरेश गणपत भोसले यांचा नदीत बूडून मृत्यू झाला. तळा तालुक्यात संजय ग. जंगम यांचाही नदीत बुडून मृत्यू झाला. मुरूड तालुक्यात विठाबाई गायकर यांच्या अंगावर भिंत कोसळून त्यांचा मृत्यू झाला, तर पेण तालुक्यात कामार्ली येथे घराची भिंत कोसळून चंद्रभागा नामदेव पाटील जखमी झाल्या. १२ मोठी जनावरे व १२ लहान जनवारांचाही जिल्ह्यात मृत्यू झाला आहे.

यंदा वार्षिक पर्जन्यमानाच्या केवळ ७४ टक्के पाऊस पडला आहे. पावसाळ्यात रायगड जिल्ह्यातील महाड, नागोठणे, रोहा या शहरांमध्ये मोठे पूर येत असतात. यंदा या शहारांमध्ये मोठे पूर आले नाहीत. अद्याप पावसाचे काही दिवस बाकी आहेत.


राम प्रहर

दिवाळी २०२५

मुक्तछंद

मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.

चला तर लागूया कामाला...

ramprahar@gmail.com

# ‘नेपाळमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना सुखरुप आणण्यास प्राधान्य’



**मुंबई : प्रतिनिधी**

नेपाळमधील राजकीय अस्थिरता आणि त्यामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तिथे अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना सुखरुप परत आणण्यासाठी राज्य सरकार युध्द पातळीवर प्रयत्न करत आहे.

केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालय तसेच महाराष्ट्र सदन यांच्या माध्यमातून राज्य शासन नेपाळमधील भारतीय दूतावासाच्या संपर्कात असून राज्यातील पर्यटकांना आवश्यक ती मदत पुरविण्याचे प्रयत्न करत आहे. नेपाळमध्ये अडकलेल्या प्रत्येक पर्यटकाला सुरक्षितपणे घरी परत आणणे आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणे हीच प्राथमिकता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटकांनी घाबरुन जाऊ नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

राज्यातील ठाणे, पुणे, मुंबई, लातूर, कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे १०० पर्यटक नेपाळमध्ये अडकले असल्याची माहिती आतापर्यंत प्राप्त झाली आहे. त्याव्यतिरिक्त बीड जिल्ह्यातून गेलेले पर्यटक रस्ता मार्गे खासगी वाहनाने परत येण्यासाठी निघालेले असून ते उत्तर प्रदेशात गोरखपूरपर्यंत पोहचले आहेत.

सर्वाधिक पर्यटक ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथील आहेत. अडकलेल्या पर्यटकांना आवश्यक ती मदत करण्यासाठी राज्य शासन तत्पर असून त्यांच्याशी संपर्क साधून आहे. सर्व पर्यटक सुरक्षित आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

## नागरिकांसाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या महत्त्वाच्या सूचना

**मुंबई : प्रतिनिधी**

नेपाळमध्ये उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रातील नागरिकांसाठी महाराष्ट्र राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामार्फत महत्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सध्या नेपाळमध्ये प्रवास टाळावा. जे नागरिक सध्या नेपाळमध्ये आहेत त्यांनी आपल्या निवासस्थानीच सुरक्षित राहावे. अनावश्यकपणे बाहेर पडू नये व स्थानिक प्रशासनाच्या तसेच भारताच्या दूतावासाच्या सूचनांचे पालन करावे. कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी दूतावासाच्या हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधावाः

+९७७-९८०८६०२८८१ (व्हॉट्सॲप कॉलसाठीही उपलब्ध)

+९७७-९८१०३२६१३४ (व्हॉट्सॲप कॉलसाठीही उपलब्ध)

राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, महाराष्ट्र, नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत आहे. कृपया अधिकृत माध्यमांद्वारेच माहिती प्राप्त करावी व अफवांपासून दूर राहावे, असे आवाहनही राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामार्फत करण्यात आले आहे.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, महाराष्ट्र (९१-९३२१५८७१४३ व्हॉट्सॲप कॉलसाठीही उपलब्ध ९१-८६५७११२३३३ व्हॉट्सॲप कॉलसाठीही उपलब्ध)

# स्मार्ट मीटरच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानातून वीज चोरी उघडकीस

**मुंबई : प्रतिनिधी**

भांडुप परिमंडलातील नेरूळ येथे टीओडी मीटरमध्ये छेडछाड करून वीज चोरी करण्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. याप्रकरणी संबंधित ग्राहकांवर विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार कारवाई करण्यात आली आहे.

महावितरण नेरूळ विभागाचे कर्मचारी जुईनगर सेक्टर २३ येथे वीज तपासणीसाठी गेले असता, संजीवनी घरटकर यांचा घर क्र. १११ प्लॉट नंबर २०१५ यांच्या मीटर क्षमता ५.३० एमपी रीडिंग ४०३ केडब्ल्यूएच असून याची तपासणी केली असता सदर मीटर ५२ टक्के इतक्या मंद गतीने चालत होते व सील हाताळलेले दिसत होते. मीटरची तपासणी केल्यावर मीटरच्या सर्किटमध्ये फेरफार करून वीजचोरी होत असल्याचे निदर्शनास आले. ग्राहक प्रतिनिधी सिद्धेश विकास घरटकर यांना मीटर दाखवून त्यांचा समक्ष व पंचांच्या सहीनुसार सदर मीटर सील बंद करण्यात आले.

ही बाब ही भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये वीज चोरीच्या असल्याचे ग्राहक प्रतिनिधी श्री सिद्धेश घरटकर यांच्या निदर्शनास



आणून दिली व ती त्यांनी मान्य केली. संजीवनी घरटकर यांच्या घराचा विद्युतभार एकूण पाच केडब्ल्यू इतका आहे तरी वापरदार संजीवनी घरटकर यांनी अनधिकृतपणे मीटरमध्ये फेरफार करून गेल्या दोन महिन्यांत कंपनीचे एकूण ४०३ युनिटचे रक्कम रुपये १२,४४३ व तडजोड रक्कम रुपये १०,००० रुपयांचे असे एकूण रु.२२,४४३आर्थिक नुकसान चोरी करून केलेले आहे. अति. कार्यकारी अभियंता विनायक बुधवंत यांच्या मार्गदर्शनाखाली याबाबत संजीवनी घरटकर यांच्या विरोधात भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये कायदेशीर फिर्याद दाखल करून गुन्हा दाखल करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, पनवेल ग्रामीण विभागात दोन वीजचोरीच्या घटना निदर्शनास आल्या असून सदर घटनांमध्ये १८,२०० व ५,४०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आले आहे.

सध्या महावितरणकडून अत्याधुनिक टीओडी मीटर ग्राहकांना बसविले जात आहेत, टीओडी मीटर हे थेट महावितरणच्या नेटवर्क सर्व्हरला जोडलेले असल्याने या मीटरमध्ये छेडछाड केल्यास, मीटर नादुरुस्त झाल्यास महावितरणकडे तत्काळ त्याचक्षणी माहिती (रिअल टाईम डाटा) उपलब्ध होते. अशा ग्राहकांवर विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ व १३८ नुसार वीज चोरीची कारवाई करण्यात येते.

वीज मीटरमध्ये छेडछाड करून, वीज वाहिन्यांवर आकडे टाकून व अन्य मार्गाद्वारे वीजचोरी करणे हा एक गंभीर स्वरुपाचा फौजदारी गुन्हा असुन त्यात सहापट आर्थिक दंड व सहा महिने ते पाच वर्षांपर्यंतच्या तुरूंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. तरी, ग्राहकांनी कुठल्याही वीज मीटरमध्ये छेडछाड करू नये; अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आवाहन महावितरणच्या भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी ग्राहकांना केले आहे.

# नांदगाव हायस्कूलमध्ये पंचक्रोशीचा गौरा गणेश

**मुरुड : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना आपली संस्कृती कळावी मुलांमध्ये धार्मिक व आध्यात्मिक भावना वृद्धिंगत होण्यासाठी दरवर्षी श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथे साखर चौथ गणपती पंचक्रोशीचा राजा विराजमान होत असतो.

मोठ्या भक्ती भावाने व विधिवत पूजा अर्चा करून या गणरायाची स्थापना केली जाते. यंदाचे हे दहावे वर्ष असून या पंचक्रोशी राजाची स्थापना माजी मुख्याध्यापक चिंतामणी जोशी यांनी केली होती.आज ते या शाळेचे संचालक असून साखर चौथ गणपतीची चोख



व्यवस्था बजावताना दिसत आहेत.आज सकाळी या गणरायाचे आगमन वाजत गाजत करण्यात येऊन या गणरायाची विधिवत पूजा ज्येष्ठ पुरोहित भालचंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या वेळी गणरायाच्या पूजेचा मान येथील शिक्षिका राजश्री घाडगे व त्यांचे पती यांना मिळाला. उत्कृष्ट सजावट व गणरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची व्यवस्था सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पहात आहेत.

गणरायाचे विराजमान होताना मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, ज्येष्ठ पुरोहित शैलेश जोशी, नियती ठमके, निशा बिरवाडकर, महादू अहिरे, संचालक गणेश गाणार, कार्याध्यक्ष जयजयरथ काकनाटे, शिल्पा कळके, दत्ता खुळपे, मुख्य लिपीक मंगेश नांदगावकर, राहील घलटे आदी मान्यवरांसह संचालक मंडळातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# शेतातील मातीची परीक्षा आता गावातच! रायगडात १५ प्रयोगशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मृद आरोग्य व सुपीकता कार्यक्रम २०२५-२६ मध्ये ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्यास मान्यता मिळाली आहे. जिल्हा कृषी विभागाने पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागवले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील मातीचे परीक्षण थेट गावातच करता येणार असून, वेळ आणि खर्चदेखील वाचणार आहे.

माती परीक्षण म्हणजे मातीचा रासायनिक व सेंद्रिय पदार्थांचा अभ्यास करणे. हे शेतीमध्ये पीक उत्पादन वाढवण्यासाठी, योग्य पिकांची निवड करण्यासाठी, खतांचा योग्य वापर करून खर्च कमी करण्यासाठी, मातीची सुपीकता सुधारण्यासाठी आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी केले जाते. प्रयोगशाळा चालविण्याची संधी कृषी चिकित्सालय, कृषी व व्यवसाय केंद्र, माजी सैनिक, शेतकरी उत्पादक संस्था, सहकारी संस्था, निविष्ठा विक्रेते, बचत गट तसेच शालेय व महाविद्यालयीन तरुण-तरुणींना अर्ज करता येईल.

यासाठी अर्जदाराचे वय १८ ते २७वर्षे हवे. किमान शैक्षणिक पात्रता दहावी (विज्ञानासह) उत्तीर्ण, एमएस-सीआयटी प्रमाणपत्र आवश्यक, प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी स्वतःकडे चार वषपिक्षा जुन्या नसलेल्या इमारतीचा ताबा असणे, आधार कार्ड आवश्यक असणार आहे. जर प्राप्त अर्जाची संख्या निश्चित लक्षांकापेक्षा जास्त असेल, तर जिल्हास्तरीय निवड समितीकडून पारदर्शक सोडत प्रक्रिया राबवून अर्जदारांची निवड केली जाईल.

१.५ लाख अनुदान शासनाकडून प्रत्येक प्रयोगशाळेसाठी दिले जाणार आहे. हा निधी आवश्यक उपकरणे, साहित्य आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी वापरला जाणार आहे. यातून शेतकऱ्यांना चांगल्या सोयीसुविधा मिळणार आहेत. जिल्ह्यात १५ ग्रामस्तरीय मृद नमुना तपासणी प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. अधिक माहितीकरिता जिल्हा मृद सर्वेक्षण रायगड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

# पनवेलकरांनी घेतले मार्केटच्या राजाचे दर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्याच्या दर्शनासाठी लाखो भक्तांचा जनसागर मुंबईत लोटतो त्या लालबागच्या राजाचे दर्शन पनवेलकरांना होत आहे. पनवेलमधील महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेच्या गौरा गणेशोत्सवात लालबागच्या राजाची प्रतिकृती विराजमान झाली आहे.

या उत्सवाचे यंदा ३३वे वर्ष आहे. महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटना व फळभाजी विक्रेते सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या ३२ वर्षांपासून गौरा गणेशोत्सव साजरा केला जात आहे. संघटनेचे जवळपास तीन हजारांपेक्षा जास्त सभासद असून यामध्ये छोटे मोठे व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करणाऱ्यांचा समावेश मोठ्या संख्येने आहे.

या उत्सवामागची संकल्पना स्पष्ट करताना महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचे अध्यक्ष एस.के. नाईक यांनी सांगितले की, गणेशोत्सव साजरा होत असताना भाविकांना गणरायासाठी आवश्यक असणारे साहित्य विक्री करण्यात येथील व्यावसायिक गुंतलेले असतात. त्यामुळे त्यांना त्या वेळी गणेशोत्सवाचा आनंद घेता येत नाही. म्हणूनच संघटनेने ३२ वर्षांपूर्वी गौरा गणेश उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली. आधी वेगवेगळ्या मूर्तींची येथे प्रतिष्ठापना केली जात होती, परंतु गेल्या २६ वर्षांपासून लालबागच्या राजाची प्रतिकृती पनवेलमध्येच तयार करून तिची स्थापना केली जाते.

या बाप्पाला भाजी मार्केटचा राजा म्हणून संबोधले जाते. ही मूर्ती संतोष रत्नाकर कांबळी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी साकारली आहे. या बाप्पाचे आगमन मोठ्या ज्लोषात झाले असून राजाचे दर्शन घेण्यासाठी भावीकांची रीघ लागली आहे.



**माणगाव : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आयोजित पर्यावरणपूरक गणपती आरास स्पर्धेत हर्षाली आणि मयुरेश बापट यांनी टाकाऊ पुठ्ठ्यांपासून गणपतीची सुंदर आणि आकर्षक आरास केल्याबद्दल त्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या वेळी शहराध्यक्ष आणि नगरसेवक नितीन वाढवळ, माजी नगरसेवक सुमित काळे, माजी प्राचार्य भास्कर बापट, सौ. बापट, सौ. जोगळेकर आदी उपस्थित होते.**

पान १ वरुन

## कामोठ्यातील सबस्टेशनसाठी महावितरणला भूखंडाचा ताबा द्यावा

भूखंड ताब्यात देण्याकरिता सिडको प्रशासनाने भाडेपट्टा रकमेसह अन्य रक्कम भरण्याबाबत महावितरणकडे कळविले होते. त्यानुसार महावितरणने प्रथम १० टक्के रकमेचा भरणा केल्यानंतर आता उर्वरित सर्व रकमेचा भरणा महावितरणतर्फे करण्यात आला असून तसे त्यांनी सिडको महामंडळाला कळविले आहे.

पुढील प्रक्रियेच्या अनुषंगाने या भूखंडाचा ताबा महावितरणला त्वरित देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देशित करावे, जेणेकरून लवकरात लवकर सबस्टेशनचे काम पूर्ण करून नागरिकांना अखंडीत वीजपुरवठा करणे महावितरणला शक्य होईल, असेही आमदार आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## ’नो पीयूसी... नो फ्युएल’ उपक्रम प्रभावीपणे राबवा

तथापि, त्याच पेट्रोल पंपावर प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र ताबडतोब काढून घेण्याची व्यवस्थादेखील केली जाईल. त्यामुळे वाहनचालकाची गैरसोय होणार नाही. या प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राला युनिक आयडेंटी (यूआयडी) असणार आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राची वेळोवेळी वैधता तपासणी केली जाऊ शकते.

भविष्यात वाहन विक्री करणाऱ्या शोरूम व वाहन दुरुस्ती करणारे गॅरेजमध्येदेखील प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था करण्यात येईल, जेणेकरून रस्त्यावर चालणारे प्रत्येक वाहन हे वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र असलेले असेल. यामुळे प्रदूषण पातळी कमी करण्यास मदत होईल. त्याबरोबरच सध्या अवैध पद्धतीने प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र काढणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यासाठी मोठा परिवहन विभागाने धडक मोहीम राबवावी, असा सूचनाही परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी या वेळी दिल्या.

# पालीत संकष्ट चतुर्थीला भाविक बल्लाळेश्वरचरणी लीन

**पाली : प्रतिनिधी**

संकष्टी चतुर्थीला बुधवारी (दि.१०) अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत भाविक बल्लाळेश्वराच्या चरणी लिन झाल्याचे पहावयास मिळाले.

बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. तसेच मंदिरा बाहेर रांगोळीदेखील काढण्यात आली होती. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह विविध भागातून भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग बोर्डिंग वाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, छोटे मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. अनेक भाविक स्वतःची वाहने घेवून आले होते. तर काही लक्झरी किंवा खाजगी बसेसने आले. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

### व्यवसायाला चालना

संकष्ट चतुर्थी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी आले होते. या भाविकांनी दुकानातून चांगली खरेदी केली. त्यामुळे धंदा चांगला झाला आहे. बल्लाळेश्वर मंदिर परिसरातील व्यावसायिक मनोहर मोरे यांनी सांगितले.




# चौक येथील दगडी शाळा झाली १६९ वर्षांची

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ऐतिहासिक चौक गावातील ब्रिटीशकालीन दगडी शाळेला एकशे एकोणसत्तर वर्ष पूर्ण झाल्याने आज १६९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

रायगड जिल्हा परिषदेच्या चौक शाळेची (दगडी शाळा) स्थापना १८५६ रोजी झालेली आहे. या ऐतिहासिक शाळेचा स्थापना दिवस ८ सप्टेंबरला साजरा केला जातो. यावर्षी स्थापना दिवसाचा विशेष कार्यक्रम शाळेमध्ये ९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास परिसरातील मान्यवर, माजी विद्यार्थी, पालक आवर्जून उपस्थित होते.



विद्यार्थ्यांनी गायलेल्या गीतांनी कार्यक्रमाची सुरुवात झाली. पाहुण्यांच्या हस्ते वर जाणाऱ्या फुलपाखरांनी १६९ आकडा खुला करून कार्यक्रमाचे अनोखे उद्घाटन झाले. शाळेच्या उपक्रमांचे झझढ द्वारे सादरीकरण करण्यात आले. शाळेचे मासिक ’प्रतिबिंब’ च्या वर्धापन दिन विशेषांकाचे प्रकाशन डॉ. सचिन सोनावणे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या अंकाचे प्रायोजक डॉ. सोनावणे हे होते. तसेच, शाळेचे माजी विद्यार्थी मंगेश जाधव यांच्या सहकार्याने बनवण्यात आलेल्या शाळेच्या वेब साईटचे उद्घाटन विद्यमान उपसरपंच पूजा हातमोडे व माजी उपसरपंच सुभाष पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

शाळेचे त्र्याण्णव वर्षीय माजी विद्यार्थी रामभाऊ कोसे, सरपंच रितू ठोंबरे, उप सरपंच पूजा हातमोडे, ग्राम पंचायत सदस्य नयना झिंगे, वृषाली आंबवणे, डॉ.सचिन सोनावणे, नरेंद्र शहा, ज्येष्ठ नागरिक संघ अध्यक्ष अलका वीरभद्रे व इतर सदस्य, सकपाळ , व्यापारी असोसिएशन अध्यक्ष हर्षल हनुमंत, सामाजिक कार्यकर्ते सतीश शिर्के इत्यादी नागरिक उपस्थित होते. केक कापून शाळेचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे शिक्षक व विद्यार्थ्यांबरोबरच ग्रामस्थ व माजी विद्यार्थी अरुण घोडके, सुदेश महागावकर यांनी विशेष मेहनत घेतली. रंजना साखरे, विजय ठाकरे, नरेंद्र शहा, प्रफुल्ल विचारे, आचार्य सर, विराज शिंदे यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

## दुखवटा

### शशिकांत पारवे



**मुरूड** : तालुक्यातील महाळुंगे (बुद्रुक)चे ज्येष्ठ समाजसेवक तसेच सुदर्शन भात गिरणी संघाचे चेअरमन शशिकांत रामचंद्र पारवे यांचे नुकतेच निधन झाले. मुरूड तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, बोर्ली-मांडला विविध कार्यकारी सोसायटी, श्रीदत्तमंदिर ट्रस्ट सुरई आदी विविध संस्थांवर ते कार्यरत होते. एक उत्तम शेतकरी, उत्तम सुतार, उत्तम खेळाडू व बैलगाडा शौकीन म्हणून ते पंचक्रोशीमध्ये प्रसिद्ध होते.

### अजित माने



**नागोठणे** : रोहा येथील छत्रपती संभाजी नगरमधील रहिवासी तसेच नाभिक समाजाचे कार्यकर्ते अजित लक्ष्मण माने (वय ५४) यांचे पनवेल येथे सोमवारी (दि.८) निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व मुलगी तसेच भाऊ, विवाहित बहिणी असा परीवार आहे. कै. अजित माने यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि.१७) व उत्तरकार्य शुक्रवारी (दि.१९) छत्रपती संभाजी नगर रोहा येथील निवासस्थानी होणार आहे.

# पनवेलमध्ये पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य

## महापालिकेच्या उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाच्या माध्यमातून पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करण्याकरिता आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली होती. या माझी वसुंधरा ६.० उपक्रमांतर्गत विविध अभिनव उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

त्यातील पहिला उपक्रम म्हणजे पर्यावरणपूरक गणेश उत्सव करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने सप्तसुत्री प्रसिद्ध केली होती. या सप्तसुत्रीचा अवलंब करून नागरिकांनी गणेशोत्सव पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले होते तसेच या सप्तसुत्रीसाठी पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून या संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले होते. ज्यामध्ये सप्तसुत्रीचे सर्टिफिकेट प्रमाणपत्र डाउनलोड करण्याचा सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.



उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनुसार पर्यावरणपूरक गणेश उत्सवास प्रोत्साहन देण्याच्यादृष्टीने पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये घरगुती गणेशोत्सव व सार्वजनिक गणेशोत्सव अशा दोन स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये एकूण एक लाख रुपयांची बक्षीसे ठेवण्यात आली होती. नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा यासाठी 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा' या उपक्रमांतर्गत पालिकेने प्रियदर्शनी इंदलकर व ओंकार राऊत या दोन मराठी अभिनेत्यासह व दहा सोशल मिडिया इन्फ्लुअर्सच्या व्हिडिओच्या माध्यमातून सोशल मिडियावरून तसेच जागोजागी बॅनरर्सच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली होती.

पर्यावरण पूरक गणेशोत्सव सजावट स्पर्धेतर्गत घरगुती विभागामध्ये सुमारे जवळपास ४९० नागरिकांनी सहभाग घेतला व सार्वजनिक गणेश उत्सव मंडळामध्ये १०४ मंडळांनी सहभाग घेतला ज्यांचे परीक्षकांमार्फत परीक्षण पुर्ण करण्यात आले. पनवेल महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणोशोत्सवास प्राधान्य देण्यासाठी महापालिका क्षेत्रातील गणेश मुर्तीकारांना ३४ टन शाडू मातीचे वितरण केले.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनजागृती करिता दहा महाविद्यालयांमध्ये प्रभात फेरी काढण्यात आली तसेच शाळा – महाविद्यालयांमध्ये शाडू माती पासून मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. याचबरोबर या उपक्रमांतर्गत ५० महाविद्यालयांमध्ये महापालिकेच्या वतीने मागील वर्षी तयार केलेला 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा' हा लघुपट लहान मुलांना दाखविण्यात आला.

### 'मिशन ५०'

गृहनिर्माण संस्थेमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव जनजागृती करण्याकरिता 'मिशन ५०' नावाचा उपक्रम राबविण्यात आला, ज्यामध्ये ५० सोसायटीमध्ये पर्यावरणपूरक गणेश उत्सव साजरा करण्याकरिता बैठक तसेच एकूण ५० परिसंवाद व १०० चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आल्या. या उपक्रमाच्या कालावधीदरम्यान नागरिकांमध्ये माझी वसुंधरा अभियान अंतर्गत माहिती प्रसारित करण्याकरिता नागरिकांना पर्यावरण संरक्षणाची प्रतिज्ञा घेण्याचे आवाहन करण्यात आले होते, या उपक्रमादरम्यान पाच हजारांहून अधिक नागरिकांनी प्रतिज्ञा घेतल्या आहेत.

## निवडक

### वाहनाच्या धडकेत ज्येष्ठाचा मृत्यू

**पनवेल :** वाहनाच्या धडकेत ७३ वर्षीय मंगेश सालकर यांचा मृत्यू झाला. या अपघातप्रकरणी अनोळखी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मंगेश सालकर हे ११ ऑगस्ट रोजी चालण्यासाठी गेले होते. ते रात्री उशिरापर्यंत घरी आले नाहीत. त्यामुळे त्यांच्या पत्नीने त्यांच्या मोबाईलवर फोन केला असता एमजीएम हॉस्पिटल सीबीडी येथील स्टाफ ने कॉल उचलला आणि त्यांच्या पतीचा अपघात झाला असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचे सांगितले. ते रुग्णालयात पाहण्यासाठी गेले असता त्यांचा मृत्यू झाला. अज्ञात मोटर वाहनाने निळकंठ स्वीट मार्ट खारघर येथे त्यांना ठोकर दिली. महिन्यानंतर वाहन चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### गाडीमधून दागिन्यांसह पैसे लंपास

**पनवेल :** तालुक्यातील पेठगाव येथील वेलकम हॉटेल परिसरात उभ्या करून ठेवलेल्या गाडीमधून लाखो रुपये किमतीच्या दागिन्यांसह रोख रक्कम अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे. ज्योती राणे यांनी त्यांच्या कुटुंबियांसोबत चार चाकी गाडी पनवेल तालुक्यातील पेठगाव येथील वेलकम हॉटेल परिसरात उभी करून ते जेवणासाठी गेले असता अज्ञात चोरट्याने गाडीची काच फोडून गाडीमध्ये असलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल फोन व इतर कागदपत्रे असा मिळून जवळपास चार लाख ४१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### रेल्वेच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** रेल्वेच्या धडकेने एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील सेक्टर ६ करंजाडे रेल्वे पटरीच्या मध्ये घडली आहे. रामपाल सिंग (वय ५०) या व्यक्तीचा सेक्टर सेक्टर ६ करंजाडे रेल्वे पटरीच्या मध्ये पनवेल ते उरण अश्या जाणाऱ्या रेल्वे पटरीवर पोलनंबर ७१/३४ जवळ हा अपघात घडून त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### टीबी फोरम समितीची सभा

**पनवेल :** ९ सप्टेंबर रोजी पनवेल तालुका टी. बी. फोरम समितीची सभा उपविभागीय (प्रांत) अधिकारी पवन चांडक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. टीबीमुक्त ग्रामपंचायत अभियान यशस्वी करण्यासाठी डॉ. अपर्णा सागर पवार तालूका आरोग्य अधिकारी पनवेल यांनी यावेळी मार्गदर्शन केले. या सभेस डॉ. सुनील जाधव नायब तहसीलदार पनवेल, डॉ. उषा राठोड CTO PMC, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रविण पाटील, डॉ. वैभव मोकल, संतोष घोडिंदे, गुणवंत राव चव्हाण, डॉ वैशाली म्हात्रे, डॉ आकाश वावेकर, जे. एस चिखलेकर, एस के ढवळे, आरोग्य विस्तार अधिकारी दिलीप झावरे तसेच आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक / सेविका व आशा सेविका उपस्थित होत्या.



# फसव्या ट्रेडिंगद्वारे ६२ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

ग्रुपमधील इतरांच्या नफ्याला भुलून गुंतवणूक करणे एक व्यक्तीला चांगलेच महागात पडले आहे. गुन्हेगारांच्या जाळ्यात फसून या व्यक्तीने महिन्याभरात ६२ लाख रुपये गमावले आहेत. तर गुंतवणुकीसाठी मित्रांकडे अधिक पैशाची मागणी करत असतानाच मित्राच्या पत्नीच्या अनुभवावरून त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले.




तळोजा परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीबरोबर हा प्रकार घडला आहे, महिन्याभरापूर्वी त्यांना ऑनलाईन शेअर मार्केटची माहिती मिळाली होती. गुंतवणुकीस इच्छुक असल्याने दाखवल्याने त्यांना एका व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये घेण्यात आले होते. त्या ठिकाणी इतर व्यक्तींकडून नफ्याच्या रकमा पाहून आपल्यालाही मोठा धनलाभ होईल, असा विश्वास त्यांचा बसला. त्यांनी महिन्याभरात ६२ लाख रुपये संबंधितांच्या खात्यावर पाठवले, मात्र नफ्याची काही रक्कम काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला असता त्यांच्याकडे वेगवेगळ्या कारणांनी अधिक पैशाची मागणी होऊ लागली.

ही रक्कम भरण्यासाठी त्यांनी एका मित्राकडे पैशाची मागणी केली होती. या वेळी त्या मित्राने त्याच्या पत्नीची अशा प्रकारातून फसवणूक झाली असल्याचे सांगितले. यावरून त्यांना आपण गुन्हेगारांच्या जाळ्यात फसल्याचे लक्षात येताच त्यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार करताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





**पनवेल : तालुक्यातील सुकापूर येथे दीपक भगत यांनी कृतिका प्रिंटर्स सुरू केले आहे. त्याचे उद्घाटन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी झाले. या वेळी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, विचुंबेचे सरपंच प्रमोद भिंगारकर, यतीन पाटील, हभप शंकर पाटील, महेश पाटील, किशोर सुरते, डॉ. अशोक म्हात्रे, राज वाघमारे, अलंकार भोईर आदी उपस्थित होते. कृतिका प्रिंटर्समध्ये छताखाली बॅनर प्रिंटींग, डिजिटल प्रिंटींग आणि ऑफसेट प्रिंटींग करून मिळणार आहे.**

## गौरा गणपती दर्शन



**नितीन शेडगे, दिघाटी, पनवेल**



**भरत गणा गावंड, दिघाटी, पनवेल**



**समाधान भोईर, करंजा, उरण**

# संकष्ट चतुर्थीनिमित्ताने गणेश मंदिरांमध्ये गर्दी



**उरण : वार्ताहर**

संकष्टी चतुर्थी निमित्ताने बुधवारी (दि.१०) उरण तालुक्यातील गणेश मंदिरात दर्शनासाठी भक्तांची गर्दी दिसत होती. उरण मोरा येथील गणेश मंदिर, उरण शहरातील गणपती चौक येथील श्री गणपती देवस्थान येथील गणपती दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराच्या पुढील बाजूला दुर्वा हार, फुलांचे हार, जास्वंद फुले, नारळ यांचे दोन दुकाने उभारण्यात आली होती. केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक गावातील रिद्धी-सिद्धि विनायक मंदिर येथे हि भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. त्याच प्रमाणे चिरनेर तीर्थक्षेत्रातील महागणपती मंदिरातील स्वयंभू गणपती मंदिरात पहाटे पासूनच भक्तांनी रांगेत दर्शन घेतले.

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान व प्रसिद्ध चिरनेर तीर्थक्षेत्रातील महागणपती मंदिरातील स्वयंभू गणपती मंदिरात श्री महागणपतीचे दर्शन घेण्यासाठी पहाटेपासूनच सुरुवात झाली.

# नवीन पनवेलच्या सीकेटी ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षक दिन साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा बुधवारी (दि.१०) शिक्षक दिन उत्साहात झाला.

शिक्षक दिनानिमित्त उच्च माध्यमिक विभागाचे कामकाज विद्यार्थी-शिक्षकांनी पाहिले. बारावी कला वाणिज्य विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले. सर्वच विद्यार्थी शिक्षकांचा प्रयत्न कौतुकास्पद होता. विज्ञान विभागातून हंसिका कलाल तर कला वाणिज्य विभागातून पर्णवी शिवणेकर या विद्यार्थिनींनी प्राचार्यांची भूमिका बजावली. विज्ञान विभागातून पर्यवेक्षक म्हणून कोमल वर्मा तर कला वाणिज्य विभागातून सुयश पोल या विद्यार्थ्यांनी कामकाज पाहिले.

उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच सहशिक्षिका उजमा कच्छी, योगिता जोरी, सहशिक्षक कपिल दांडगे या सर्वांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेतर्फे सचिव डॉ. एस टी गडदे तसेच प्राचार्य प्रशांत मोरे यांच्या हस्ते उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक वृंद, चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्ग,कार्यालयीन सेवक वर्ग व संस्था कार्यालयातील सेवकवर्ग या सर्वांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी संस्थेचे सचिव डॉ. एस टी गडदे यांनी उच्च माध्यमिक विभागातील सर्व शिक्षकांच्या कामगिरीचे कौतुक केले. तसेच प्राचार्य प्रशांत मोरे यांनीही मार्गदर्शन करून सर्व शिक्षकांना शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# चिरनेर कातळपाडा येथे साखरचौथ गणेशाची प्रतिष्ठापना

**उरण : प्रतिनिधी**

भक्तांचे दुःख हरण करणाऱ्या व ज्याच्या दर्शनासाठी हजारो भक्तांचा सागर चिरनेर गावात लोटतो. त्या चिरनेर कातळपाडा येथील साखरचौथ गणपतीच्या दर्शन यंदा चिरनेरकरांना दहा दिवस होणार आहे.

चिरनेर कातळपाडा येथील विघ्नहर्ता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सार्वजनिक साखर चौथ गणेशोत्सव साजरा होत असून, यंदा मंडळातर्फे भव्य गणराजाची प्रतिकृती दहा दिवसांसाठी विराजमान करण्यात आली आहे. यंदाची गणेश मूर्ती सुमारे अकरा फूट उंच सिंहासनावर आरुढ असून, चिरनेर गावात प्रथमच इतक्या उंचीची मूर्ती बनविण्यात आली आहे. गणपती बाप्पाच्या प्रभावळीवर ओरिसा राज्यातील जगन्नाथ पुरीच्या तीन देवतांची प्रतिकृती साकारली आहे.



प्रग्नेशा आर्टचे स्थानिक मूर्तिकार नरेश हातनोलकर, जितेश हातनोलकर, यांनी बाप्पाच्या रंगसंगतीच्या सजावटीचे काम अतिशय सुंदर पद्धतीने केले आहे. दरवर्षी या मंडळाच्या माध्यमातून वेग वेगळ्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाते. मंडळाचे हे १७ वे वर्ष असून, राजन वशेणीकर, यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे तरुण कार्यकर्ते आणि शुभचिंतक कार्यरत आहेत. सजावट आणि भव्य मिरवणूक तसेच मिरवणुकीत होणारी फुलांची उधळण हे या मंडळाचे दरवर्षीचे आकर्षण असून दरवर्षीची परंपरा कायम राखत मंडळाने यावर्षीही साखर चौथीचा गणेश उत्सव साजरा करण्यात येत आहे.

# एमएनएम विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरु नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या माध्यमिक विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी बोरकर्स मदर केअर मार्फत विद्यार्थी आरोग्य व बदललेली जीवनशैली याचा शारीरिक आणि मानसिक विकास यावर होणारा परिणाम या विषयाचे मार्गदर्शन डॉक्टर कृष्णा बोरकर व डॉ. मीना बोरकर यांनी केले.



शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. वरील प्रसंगी बोलताना डॉक्टर मीना बोरकर मुलींच्या आरोग्य विषयक तक्रारी तसेच मुलींच्या मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी तसेच वैयक्तिक स्वच्छतेचे महत्व सांगितले. डॉक्टर कृष्णा बोरकर यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक महत्त्वाचे तत्वे सांगत असताना, पुरेशी झोप, व्यायाम, योगासने, संतुलित आहार खेळ तसेच छंद याचे जीवनामध्ये असलेले अनन्य साधारण महत्व विशद करत तणाव मुक्त जीवनशैली याचा अवलंब करावा याचे महत्त्व पटवून दिले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या आरोग्य विषयक माहितीचा वापर दैनंदिन जीवनात करावा, असे सांगितले. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, तसेच माध्यमिक विभागाच्या शिक्षक व शिक्षिकांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

## संपादकीय

# भारताच्या चिंतेत वाढ?

**गेल्या काही वर्षांत भारताच्या शेजारी राष्ट्रांमध्ये घडलेल्या राजकीय उलथापालथी चिंता वाढवणाऱ्या आहेत. श्रीलंका, बांगलादेश आणि आता नेपाळ, तिन्ही देशांमध्ये उग्र आणि हिंसक जनआंदोलनातून सत्तापालट घडून आला. यापैकी बांगलादेश आणि नेपाळमध्ये आंदोलनात युवकांचा सहभाग होता. तिन्ही देशांमध्ये सत्ताधारी प्रमुखांना देश सोडणे भाग पडले. या उलथापालथींतून भारताकरिता सुरक्षाविषयक समस्या तर निर्माण होणार नाही?**

नेपाळमधील तत्कालीन पंतप्रधान के.पी. ओली यांच्या सरकारने समाजमाध्यमांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतल्याचे निमित्त होऊन तेथे सोमवारी तरुणांचे उग्र आंदोलन पेटले, पण त्याही आधी देशातील भ्रष्टाचार, बेरोजगारी, आर्थिक दुरवस्था व मोजक्या लोकांची विलासी राहणी या साऱ्याविरोधात नेपाळी जनतेमध्ये असंतोष खदखदत होता. युवकांच्या हिंसक आंदोलनाला आटोक्यात आणण्यासाठी गोळीबार केला गेला आणि त्यात २०हून अधिक जण मारले गेले. यातून आंदोलन आणखी उग्र झाले. अनेक मंत्र्यांना मारहाण झाली. अखेर पंतप्रधान ओली यांना राजीनामा देऊन देशाबाहेर पळ काढावा लागला. साधारण अशीच परिस्थिती गेल्या चार वर्षांत भारताच्या अन्य तीन शेजारी देशांमध्ये दिसली आहे. गेल्या वर्षी बांगलादेशात विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे पंतप्रधान शेख हसीना यांना सत्ता आणि देश सोडावा लागला. त्यांनी भारतात आश्रय घेतल्याचे नंतर चर्चिले गेले. त्याच्याही आधी श्रीलंकेत जनतेच्या हिंसक उठावामुळे राजपक्षे यांचे सरकार कोसळले होते. राजपक्षे हेही तेव्हा श्रीलंका सोडून पळून गेले. दुसरीकडे पाकिस्तानातील निवडणुकीत लष्करी हस्तक्षेपातून लोकप्रिय नेता इमरान खान यांना तुरुंगात टाकण्यात आले आणि शाहबाज शरीफ यांना सत्तेवर विराजमान करण्यात आले. या तीन शेजारी देशांपाठोपाठ आता तशीच राजकीय उलथापालथ नेपाळमध्ये घडून आल्याने यामागे एखाद्या बाह्यशक्तीचा डाव तर नाही ना अशी चर्चा सुरू झाली आहे. श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळ या देशांमधील आंदोलनाचे वरकरणी दिसणारे निमित्त वेगळे असले तरी आंदोलनांचे सार्वजनिक संपत्तींचे नुकसान करणारे उग्र स्वरुप, सर्वोच्च राजकीय नेतृत्वाविरोधातील हिंसाचार आणि अंतिमत: नव्या नेतृत्वाला सत्तेवर बसवणे हे सारे सारखेच आहे. त्यामुळेच या शेजारी देशांमधील राजकीय उलथापालथींचा भारतावर नेमका काय परिणाम संभवेल याची चर्चा आता होते आहे. नेपाळमधील हिंसक आंदोलनावर भारताने सावध प्रतिक्रिया दिली आहे. भारत आणि नेपाळ यांच्यात ऐतिहासिकदृष्ट्या जवळचे संबंध राहिले आहेत. सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्याही भारत आणि नेपाळ एकमेकांशी जोडलेले आहेत. पण नुकतेच पायउतार झालेले नेपाळचे पंतप्रधान ओली हे चीनशी जवळीक साधून होते. तसे असले, तरी शेजारी देशातील अशांतता ही चिंतेची बाब असतेच. नेपाळचे भौगोलिक स्थान भारतासाठी महत्त्वाचे आहे. भारत आणि चीन यांच्यातील 'बफर स्टेट' म्हणजेच ढालीचे काम नेपाळ करतो. त्यामुळेच नेपाळमधील राजकीय उलथापालथ भारताच्या दृष्टीने चिंतेचा विषय ठरते. काही महिन्यांपूर्वीच नेपाळला पुन्हा हिंदू राष्ट्र घोषित करून राजेशाही प्रस्थापित करावी यासाठी तेथे उग्र आंदोलन झाले होते, पण यावेळचे आंदोलन खूपच हिंसक होते. भारतासाठी आधीच पूर्वेकडील सीमेकडे बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न आहे. बांगलादेशातील हंगामी सरकारची भारतविरोधी भूमिकाही लपून राहिलेली नाही. नेपाळमधील उलथापालथींचा लगेच भारतावर परिणाम संभवत नसला तरी सर्व शेजारी राष्ट्रांमधील अलीकडच्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारताला नेपाळमधील घडामोडींकडे लक्ष ठेवावे लागणार आहे.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना ग्रामीण उद्योजकतेला चालना

भारत सरकारने ग्रामीण भागातील असंघटित अन्नप्रक्रिया उद्योगांना औपचारिक स्वरूप देण्यासाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना (PMFME) सुरू केली आहे. ही योजना २०२०-२१ पासून सुरू आहे.

योजनेचा उद्देश : असंघटित अन्नप्रक्रिया उद्योगांना औपचारिक स्वरूप देणे, उत्पादनात गुणवत्ता आणि मूल्यवर्धन करणे, अन्न सुरक्षा मानकांचे पालन सुनिश्चित करणे, ग्रामीण भागात रोजगार संधी निर्माण करणे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे.



आर्थिक सहाय्य : वैयक्तिक उद्योजकांना त्यांच्या प्रकल्प खर्चाच्या ३५%पर्यंत अनुदान, जास्तीत जास्त १० लाख; SHGs, FPOs, सहकारी संस्था यांना मूल्य साखळीतील अन्नप्रक्रिया यंत्रणा उभारण्यासाठी अनुदान; सामायिक पायाभूत सुविधा जसे की प्रक्रिया केंद्र, शीतगृह, गोदाम यासाठीही अनुदान; पत संलग्न भांडवली अनुदान: प्रकल्प खर्चाच्या ३५%पर्यंत, जास्तीत जास्त तीन कोटी (प्रकल्प खर्च १० कोटीपेक्षा जास्त नसावा).

ब्रँडिंग आणि मार्केटिंगसाठी सहाय्य : उत्पादनाच्या ब्रँडिंग व विपणनासाठी एकूण खर्चाच्या ५०%पर्यंत अनुदान, पॅकेजिंग, मानकीकरण, गुणवत्ता नियंत्रणासाठी मदत, प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी पाच लाखांपर्यंत सहाय्य.

अन्य सुविधा : उद्योजकांसाठी प्रशिक्षण व कौशल्य विकास, तांत्रिक व व्यावसायिक मार्गदर्शन, बँक कर्ज जोडणीसाठी सहाय्य.

योजनेसाठी पात्रता : असंघटित अन्नप्रक्रिया उद्योग, वैयक्तिक सूक्ष्म उद्योजक, स्वयं-सहायता गट (SHGs), शेतकरी उत्पादक गट (FPOs), सहकारी संस्था व उत्पादक सहकारी संस्था, योजनेंतर्गत समाविष्ट उद्योग, फळे व भाजीपाला प्रक्रिया, धान्य व कडधान्ये प्रक्रिया, दुग्ध प्रक्रिया, मांस व कुक्कुटपालन प्रक्रिया, मत्स्य प्रक्रिया, तेलबिया प्रक्रिया, पेय व मसाले प्रक्रिया.

आवश्यक कागदपत्रे : आधार कार्ड, पॅन कार्ड; बँक खाते तपशील, व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (असल्यास), प्रकल्प अहवाल, जमीन/भाडेकरार दस्तऐवज, भागीदारी करार किंवा संस्था नोंदणी (लागू असल्यास)

अर्ज प्रक्रिया : इच्छुक उद्योजकांनी आपल्या जिल्हा किंवा तालुका स्तरावरील कृषी विभागाशी संपर्क साधावा किंवा अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करावा. अर्ज प्रक्रिया संबंधित अन्नप्रक्रिया विभागामार्फत राबवली जाते.

PMFME योजना म्हणजे ग्रामीण भागातील अन्नप्रक्रिया उद्योगांना बळ देणारा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकरी, महिला गट, आणि स्थानिक उद्योजकांना आर्थिक मदत, प्रशिक्षण आणि बाजारपेठेपर्यंत पोहच मिळते. स्वावलंबन आणि गुणवत्ता यांचा संगम साधणारी ही योजना ग्रामीण भारताच्या विकासासाठी एक मजबूत पायाभूत व्यवस्था निर्माण करत आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.


**-सुनील सोनटक्के, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र**

# सुप्रसिद्ध कवी आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ अनिल

सुप्रसिद्ध कवी आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ अनिल यांचा जन्म ११ सप्टेंबर १९०१ रोजी मूर्तिजापूर येथे झाला. मुर्तिजापूर येथे शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर १९१९ साली ते पुण्यात आले. फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेचा अभ्यासक्रम करीत असताना त्यांचा कुसुम जयवंत या तरुणीशी परिचय झाला . त्याचे पुढे प्रेमात रुपांतर होऊन ६ ऑक्टोबर १९२९ रोजी त्याची परिणती विवाहात झाली. कुसुमावती देशपांडे यासुद्धा उत्तम लेखिका व समीक्षक होत्या.

कुसुमाभोवती रुंजी घालणारा वारा म्हणजे 'अनिल' म्हणून आत्माराम रावजी देशपांडे यांनी हे टोपणनाव घेतलं होतं. अनिल ब्राह्मण, तर कुसुम सीकेपी. १९२९ साली दोघांच्या आंतरजातीय विवाहाला प्रचंड विरोध झाला होता, पण लग्नानंतर दोघांचंही आयुष्य साहित्यिक आणि लौकिकार्थानं बहरत गेलं.

कवी अनिल दशपदी आणि मुक्तछंद या काव्यप्रकाराचे प्रवर्तक होते. मुक्तछंद हा काव्यप्रकार अनिलांनी मराठीत रुजवला. कविता मुक्तछंदात असली तरी त्यांनी कवितेचे व्याकरण आणि तालाचे भान त्यांनी कधी सोडले नाही. दहा चरणांची कविता दशपदी हा काव्यप्रकार त्यांनी सुरू केला. कवी अनिलांना इ.स. १९७९ची साहित्य अकादमीची फेलेशिप प्रदान करण्यात आली होती. १९५८ साली मालवण येथे झालेल्या मराठी साहित्य



संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले होते, तर १९७७ साली 'दशपदी'साठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

कवी अनिल आणि कुसुमावती या सुविद्य दंपतीच्या पत्रव्यवहाराचा संग्रह प्रसिद्ध आहे. सुप्रसिद्ध नाटककार महेश एलकुंचवार यांच्या हस्ते या पत्रप्रपंचाचे पुनर्प्रकाशन नागपूर येथे दि.२ जुलै २०१७ रोजी झाले. इ.स.१९२२ ते १९२७ या काळातील ती पत्रं आहेत. पत्रातून माणूस जितका खरेपणाने कळतो तितका तो आत्मचरित्रातून किंवा चरित्रातूनही कळत नाही. चरित्रात अथवा आत्मचरित्रात फक्त भूतकाळ आपल्यासमोर चितारला जातो, पण पत्रातून भूतकाळ वर्तमानाची वस्त्र लेऊन आपल्या बरोबरीने चालत राहतो.

संस्कृतीच्या काठावर फुललेलं कुसुमानिल हे एक सुंदर झाड आहे. या झाडाची सावली येणाऱ्या पिढ्यांना मिळावी, या झाडवरच्या पक्षांची किलबिल, त्याला लगडलेल्या फुलांचा सुगंध आपल्या मुलांना आणि नातवंडाना मिळावा अशा तीव्र इच्छेतून मी कुसुमानिल पुनः प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. ही एलकुंचवारांची प्रस्तावना खूपच बोलकी आहे.

अजुनी रुसूनी आहे या अत्यंत तरल काव्याची जन्मकथा अशी सांगितली जाते, एका कार्यक्रमासाठी कवी अनिल गेले होते. परत आल्यावर घराचे दार वाजवले पण काहीच प्रतिसाद मिळाला नाही. अनिलांना वाटले आपली प्रिया रूसून बसली आहे, पण त्यांची अर्धांगिनी चिरनिद्रेत गेली होती. तिचा निष्प्राण देह बघून अनिल पूर्णपणे कोसळून गेले होते. तेव्हा मनाच्या उद्विग्न अवस्थेत अनिलांच्या लेखणीतून ही कविता उमटली. खरंतर ही कविता अनिलांनी कुसुमावती यांच्या निधनापूर्वी चौदा वर्षे आधी लिहिली होती. त्यामुळे या दाव्यात काही तथ्य असेल असे वाटत नाही! ही भावस्पर्शी कविता कुमार गंधर्वांनी आपल्या अमृततुल्य स्वरात गायली आणि अमर केली.



## बदलते तंत्रज्ञान

# 'हे' नंबर्स एटीएम पिन म्हणून टाकू नका, जाणून घ्या कारण

एटीएमचा पिन आपल्याला अगदी नॉर्मल वाटत असला तरी तो आपल्या खात्याचे रक्षण करणारा एक महत्त्वपूर्ण पिन आहे. त्यामुळे एटीएम पिनची संख्या किंवा आकडे जरी सामान्य वाटत असले तरी तुमच्या बँक खात्याची सुरक्षा सुनिश्चित या एटीएम पिनने केली जाते, पण आता यातदेखील धोका होऊ शकतो. काही पिन असे आहे की त्यामुळे तुमचे बँक खाते खाली होऊ शकते.



आजकाल लोक रोख रकमेने कमी खर्च करत आहेत. त्याऐवजी लोक डेबिट आणि क्रेडिट कार्डचा अधिक वापर करत आहेत. एटीएममधून पैसे काढणे, ऑनलाइन शॉपिंग आणि बिले भरणे या सर्व गोष्टींसाठी ते कार्डचा वापर करतात.

दरम्यान, एटीएमकार्ड युजर्सना लक्ष्य करून सायबर फसवणूकही होत आहे. तुमचे एटीएम कार्ड चार अंकी पिन नंबरने सुरक्षित आहे. त्यामुळे ही संख्या जरी सामान्य वाटत असली तरी तुमच्या बँक खात्याची सुरक्षा सुनिश्चित करते, पण अनेक युजर्स त्यांचा पिन नंबर काळजीपूर्वक निवडत नाहीत. प्रत्येकजण अंदाज लावण्यास सोपी संख्या निवडतो. यामुळे हॅकर्ससाठी हे सोपे होते. सायबर एक्सपर्ट्सच्या मते, चुकीचा पिन नंबर निवडल्यास तुमचे पैसे एका क्षणात चोरले जाऊ शकते. या पोस्टमध्ये कोणते पिन नंबर वापरू नयेत? आणि कोणते सुरक्षित आहेत, चला तर मग जाणून घेऊया...

पुनरावृत्ती किंवा अनुक्रमिक संख्या वापरू नका. यामुळे हॅकर्ससाठी हे एक सोपे लक्ष्य बनते. उदाहरणार्थ, १२३४, ११११, २२२२, ३३३३, ००००, ५५५५. त्याचप्रमाणे पिन क्रमांक उलट्या क्रमाने वापरू नका (४३२१). हे खूप असुरक्षित आहे. या व्यतिरिक्त बरेच लोक त्यांची जन्मतारीख पिन नंबर म्हणून वापरतात. उदाहरणार्थ, १३०८ (१३ ऑगस्ट), १५११ (१५ ऑक्टोबर) आणि जन्म वर्ष १९९९, १९९८, २००० पिन क्रमांक म्हणून वापरली जातात. अनेकदा वाढदिवसाचा अंदाज लावणे सोपे असते, कारण ते सोशल मीडिया आणि दस्तऐवजांमध्ये असतात.


याचप्रबरोबर मोबाईल नंबर, वाहन क्रमांक आणि आधार क्रमांकदेखील सुरक्षित नाहीत, कारण त्यांचा सहज अंदाज लावता येतो. त्यामुळे त्यापासून दूर राहणेही चांगले. सायबर सिक्युरिटी रिपोर्ट्सनुसार, त्यांना हॅक करण्यासाठी काही सेकंद लागतात.

# भूदान चळवळीचे प्रणेते विनोबा भावे

भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज जयंती. रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यातील गागोदे या गावी विनोबा तथा विनायक नरहरी भावे यांचा जन्म झाला. त्यांच्या आजोबांचे नाव शंभुराव भावे. शंभुरावांचे जन्मगाव वाई. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. आजोबा आणि मातुश्रींपासून धर्मपरायनतेचे संस्कार विनोबांना मिळाले.

विनोबा भावे यांचे वडील नरहरी शंभुराव भावे व आई रूक्मिणीबाई हे नोकरीच्या निमित्ताने बडोदे येथे गेले. विनोबांचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोदे येथेच झाले. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईस जाण्यास निघाले, परंतु वाटेतच सुरतेस उतरून आई-वडिलांना न कळविताच वाराणसी येथे रवाना झाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते. एक हिमालय व दुसरे बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयातील एका समारंभात महात्मा गांधीचे भाषण झाले. त्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला.

हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती यांच्या दोन्ही प्रेरणा महात्मा गांधीच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्त्वात त्यांना आढळल्या. महात्मा गांधींशी पत्रव्यवहार केला. महात्मा गांधींची कोचरब आश्रमात ७ जून १९१६ रोजा भेट घेतली आणि तेथेच त्या सत्याग्रहश्रमात



## निमित्त

नैष्ठिक ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून जीवनसाधना सुरू केली. ऑक्टोबर १९१६ रोजी महात्मा गांधींची एक वर्षांची रजा घेऊन ते वाई येथे प्राज्ञपाठशाळेत वेदान्ताच्या अध्ययनाकरिता उपस्थित झाले. ब्रह्मविद्येची साधना त्यांचा जीवनोद्देश होता.


१९३२ सालच्या सविनय कायदेभंगाच्या सामुदायिक आंदोलनात विनोबांनी भाग घेतला. त्यांनी धुळे कारागृहामध्ये शिक्षा भोगली. सुप्रसिद्ध गीताप्रवचने या कारागृहात त्यांनी दिली. शंभरापेक्षा अधिक सत्याग्रही कैदी आणि इतर गुन्ह्यांस्तव शिक्षा झालेले कैदी या प्रवचनांच्या रविवारच्या सभेत उपस्थित असत. त्यांमध्ये शेठ जमनालाल वजाज, गुलजारीलाल नंदा, अण्णासाहेब दास्ताने, साने गुरूजी इ. मंडळी उपस्थित असत.

वैयक्तिक सत्याग्रहानंतर ७ मार्च १९५१पर्यंत पवनार येथील परंधाम आश्रमातच विनोबांनी शारीरिक आणि मानसिक तपश्चर्येत जीवन व्यतीत केले. १९३६पासून महात्मा गांधी साबरमतीचा आश्रम सोडून सेवाग्रामला म्हणजे पवनारजवळच येऊन राहिले. त्यामुळे गांधी आणि विनोबा यांचा चिरकाल संवाद चालू राहिला. गांधीच्या देहान्तानंतर सर्वसेवासंघ व सर्वोदय समाज या संस्थांची स्थापना झाली. मार्च १९४८मध्ये विनोबा दिल्ली येथे जवाहरलाल नेहरू यांच्या विनंतीवरून गेले. भारत-पाक फाळणी झाल्यानंतर परागंदा झालेले लक्षावधी शरणार्थी (सर्व बाजूंनी जीवन उद्ध्वस्त झालेले) दिल्ली, पंजाब, राजस्थान यांमध्ये आले. त्यांना धीर देण्याकरता विनोबांना पंडितजींनी बोलावून घेतले. या दौऱ्यात सर्वधर्मसमभावाचा आदेश देऊन प्रेम आणि सद्भावना निर्माण करण्याचा प्रयत्न विनोबांनी केला.

१५ नोव्हेंबर १९८२ रोजी सकाळी ९.४० वाजता पवनार येथे परंधाम आश्रमात सतत सात दिवस प्रायोपवेशन करून भूदान नेते आचार्य विनोबा भावे यांचे वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. विनोबांनी प्रायोपवेशनाद्वारे देहत्याग केला. भारत सरकारने विनोबांना भारतरत्न (मरणोत्तर, १९८३) हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.

**-साभार इंटररनेट**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# बहुगुणी नारळाचे विविध फायदे जाणून घ्या



नारळ आणि कोलेस्ट्रॉल याबद्दलचे प्रवाद अनेक वर्ष सुरू आहेत. त्यामुळे नारळ आणि त्याबाबतीतले गैरसमजदेखील त्याच वेगाने पसरलेले आहेत. भारतीय आहारात नारळाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मग कोशिंबीर असो किंवा पालेभाज्या. सणासुदीला नारळाचे दूध, ओलं खोबरं सढळ हस्ते वापरलं जातं. अनेक घरात सुंदर केस आणि तंदुरुस्त शरीरयष्टी असणाऱ्या कुटुंबांमध्ये आहारात नारळाचा सर्रास वापर केला जातो.

आहारशास्त्रातदेखील नारळ आणि नारळाच्या पदार्थांचे महत्व तितकंच आहे. अगदी नारळ पाणी ते नारळाचं तेल यासारख्या नारळाच्या विविध रूपांचा आहारामध्ये समावेश केला जातो. मधल्या काही काळामध्ये नारळावर एक सरसकट बंदी आली होती. जिथे नारळ खाणे किंवा खोबरं खाणेच किती अपायकारक आहे याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या जात असत. मात्र आयुर्वेद आणि आहार शास्त्रानुसार नारळ हा अत्यंत औषधी गुणकारी आणि आरोग्यवर्धक आहे. नारळाचं पाणी थंड गुणाचे आहे. शरीरातील अतिरिक्त चरबीला आला घालण्यासाठी नारळपाणी अत्यंत उपयुक्त आहे. किंबहुना सातत्याने स्पर्धात्मक व्यायाम करणाऱ्यांसाठीदेखील नारळपाणी अत्यंत गुणकारी आहे.

शरीरातील क्षारांचे प्रमाण योग्य प्रमाणात राखण्यासाठी आणि आर्द्रता पुन्हा पूर्ववत करण्यासाठी नारळपाणी उपयुक्त आहे. नारळ पाण्यामध्ये ग्लुकोज प्रथिन पोटॅशियम सोडियम क्लोराइड ही सगळी पोषणमूल्य नारळाच्या पाण्याचे महत्त्व वाढवतात. नारळाच्या पाण्यामध्ये जीवनसत्व अ तसंच जीवनसत्व ब याचे प्रमाण उत्तम असते. त्याचप्रमाणे ओल्या खोबऱ्याचा विचार करायला गेला तर त्याच्यामध्ये उत्तम प्रमाणात स्निग्ध पदार्थ असतात तसेच चवीला ते हलके गोड असते. ओल्या खोबऱ्याचे दूध मोठ्या प्रमाणावर पाश्चात्त्य देशांमध्ये आणि भारतातदेखील वापरले जाते वेगवेगळ्या प्रकारच्या विशेषतः गोड पदार्थ तयार करण्यासाठी ओल्या खोबऱ्याच्या दुधासारखे उत्तम द्रव्य नाही.

# माणगावमध्ये नेत्र शिबिरात १०६ जणांची तपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उद्योजक विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.१०) सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्डजवळ माणगाव याठिकाणी करण्यात आले होते.

या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन १०६ रुग्णांची तपासणी करून ५७ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. हे शिबिर दर महिन्याच्या एका बुधवारी होत असते.

# ईद-ए-मिलाद रोह्यात साजरी

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी जामे मस्जिद येथे मोहम्मद पैंगबर यांच्या जयंतीचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मौलाना सादिक मुकादम यांनी विचार व्यक्त केले.

कार्यक्रमास समाज अध्यक्ष शफी पानसरे, अरबी कमिटी अध्यक्ष मुबीन दळवी, सचिव राहील नागोठकर, सहसचिव रशीद डबीर, खजिनदार अफसर करजिकर, डायमंड अध्यक्ष समीर दर्जी, माजी अध्यक्ष बाकर साष्टीकर, यासीन पानसरे, इम्तियाज दर्जी, मुख्तार फौजे, मोहमद नवरंगे, खालिद बेबन, रियाज धनसे, बीअकील फौजे, समीर चोरडेकर, लियाकत मुल्ला, अ.रहीमन नाडकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मौलाना समीउल्ला जंजीरकर, मौलमा अशपाक अन्सरी, हाफीज जलील म्हेसकर, सेवक सज्ज़ाद पठाण यांनी परिश्रम घेतले.

## पाहिजेत

**युसुफ मेहेरअली सेंटरचे भानुबेन प्रवीण शहा माध्यमिक विद्यालय तारा, ता.पनवेल, जि.रायगड** येथे या माध्यमिक विद्यालयात विनाअनुदान तत्वावर संस्था स्तरावर **विज्ञान/गणित विषय** शिकविणाऱ्या खालील अर्हतेच्या शिक्षकाची आवश्यकता आहे. उमदेवाराने आपला अर्ज, शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रासह **दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी** अर्ज द्यावेत, **बुधवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता भानुबेन प्रवीण शहा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तारा, ता. पनवेल येथे मुलाखतीकरीता उपस्थित रहावे.**

| पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | विषय | पद संख्या |
|---|---|---|---|
| सह. शिक्षक | बी.एस्सी.बी.एड. | विज्ञान/गणित | १ |

दिनांक : १०/०९/२०२५
जावक क्र.७१/२०२५-२६

**सही/-**
**सरचिटणीस,**
युसुफ मेहेरअली सेंटर मुंबई

# शिवराज्याभिषेक नियोजन बैठक

**माणगाव : बातमीदार**

स्वराज्याचे थोरले धनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ले रायगडावरील संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून दरवर्षी प्रमाणे २४ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या द्वितीय शिवराज्याभिषेक सोहळा निमित्त आयोजन व नियोजनाची बैठक रायगड (द) जिल्हाध्यक्ष शिवश्री वैभव हरिश्चंद्र सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतीभूमी महाड येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड-रायगड या ठिकाणी उत्सवात पार पडली. या वेळी त्यांनी बोलताना सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा द्वितीय शिवराज्याभिषेक सोहळा संभाजी ब्रिगेडच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. जिल्हाध्यक्ष वैभव सुर्वे यांनी प्रास्ताविकेमध्ये महाराजांच्या द्वितीय राज्याभिषेक सोहळाचे ऐतिहासिक महत्त्व सांगितले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या कुळांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - शिरढोण, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | (मालकांचे नाव) कांचन चिंतामण ओझे |
|---|---|---|---|
| १२९/५ | ०-०३-००<br>०-१५-५०<br>**एकूण ०-१८-५०** | ०.०६ | (कुळांचे नाव)<br>गजानन भुऱ्या घरत<br>सरिता शरद हातमोड<br>जिजाबाई पुंडलिक भोईर |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रासहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १०/०९/२०२५.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - शिरढोण, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| १२९/१/२ /३/ब | ०-२४-०० | ४.६२ | गजानन भुऱ्या घरत<br>सरिता शरद हातमोडे<br>जिजाबाई पुंडलिक भोईर |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रासहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १०/०९/२०२५.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

## जाहीर नोटीस

आम्ही **शिकारा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. तर्फे संचालक श्री. अशोक मेहरा, नोंदणीकृत पत्ता २०४, बेझोला कॉम्प्लेक्स, सुमन नगर, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई - ४०००७१** व व्यावसायिक **ऑफिस पत्ता - सर्वे नं. ६७/२/१, नेरे गाव, ता. पनवेल, जि. रायगड,** तमाम जनतेच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे जाहीर नोटीस देत आहोत. आम्ही शिकारा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. खालील उल्लेखीत नेरे गाव, ता. पनवेल, जि. रायगड येथील बिगर शेती जमिनीचे मालक व विकासक आहोत. सदरची जमीन ग्रामपंचायत नेरे येथे नोंदणीकृत असून तिचे वर्णन खालीलप्रमाणे :

| क्र. | मालमत्ता क्र. / मुल्यांकन क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | ६७/२/१ | ३०७३.२८ |

सक्षम अधिकारी म्हणजेच असोसिएट प्लानर (नैना) सिडकोने आम्हास वर नमुद जमिनीवर इमारत बांधण्यास त्यांचे पत्र क्र. सिडको / नैना / पनवेल / नेरे / बीपी-००६७०/सीसी/२०२३/०४३९ दि. १ नोव्हेंबर २०२३ द्वारे कमेन्समेंट सर्टिफिकेट (प्रारंभ दाखला) दिलेले आहे. त्या अनुषंगाने आम्ही आमच्या प्रकल्पासंबंधीत खालीलप्रमाणे माहिती जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करत आहोत.

| | |
|---|---|
| **विकासकाचे नाव** | शिकारा कन्स्ट्रक्शन प्रा. लि. |
| **संचालकाचे नाव व पत्ता** | श्री. अशोक मेहरा, २०४ बेझोला कॉम्प्लेक्स, सुमन नगर, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई - ४०००७१ |
| **कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता** | श्री. सुरेश पटेल (एस.आर.वि. कन्स्ट्रक्शन), ३०३, हिल व्हिव सोसायटी, प्लॉट नं. ५०, सेक्टर ६, करंजाडे, पनवेल, जि. रायगड- ४१०२०६ |
| **विकासकाची परवानगी मंजुर झाल्याचे आदेश क्र. आणि दिनांक** | सिडको / नैना / पनवेल / नेरे / बीपी-००६७० / सीसी / २०२३/०४३९ |
| **कमेन्समेंट सर्टिफिकेट आदेश क्र. आणि दिनांक** | सिडको / नैना / पनवेल / नेरे / बीपी-००६७० / सीसी / २०२३/०४३९ |
| **मंजुर फ्लोअर स्पेस इंडेक्स (एफ.एस.आय.)** | मंजूर एफएसआय १.०० |
| **एकूण सदनिका आणि त्यांचे मंजूर क्षेत्र** | ५६ सदनिका बांधण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. एकूण बांधकाम क्षेत्र २९७०.९७९ चौ.मी. (अंगभूत) सर्वेक्षण क्रमांक ६७/२/१ - नेरे गाव |
| **मंजूर नकाशे आणि इतर संबंधित कागदपत्रांच्या प्रती तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या जागेचा पत्ता** | सर्वे नं. ६७/२/१, नेरे गाव, ता. पनवेल, जि. रायगड. |
| **वास्तुविशारदाचे नाव** | श्री. स्वप्नील कल्याणकर, आर्किटेक्ट्स, आर्किटेक्ट्स, श्री. स्वप्नील कल्याणकर |
| **संरचनात्मक अभियंताचे नाव** | मे. प्राप्ती असोसिएट्स, श्री. राम मराठे |

ठिकाण : पनवेल
दि. ०५.०९.२०२५

**सही/-**
शिकारा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. तर्फे संचालक
श्री. अशोक मेहरा

# नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत असणारे वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी मंगळवारी (दि.९) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १४७ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली. विविध वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून एक लाख ६९ हजार ५०० रुपये इतका दंड आकारला आहे.

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99
REGD. No. D. L.-33004/99

सत्यमेव जयते

भारत का राजपत्र
The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-25062025-264138
CG-DL-E-25062025-264138

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 2737] नई दिल्ली, मंगलवार, जून 24, 2025/आषाढ़ 3, 1947
No. 2737] NEW DELHI, TUESDAY, JUNE 24, 2025/ASHADHA 3, 1947

**सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय**

**अधिसूचना**

नई दिल्ली, 24 जून, 2025

**का.आ. 2803(अ).**— केंद्रीय सरकार ने, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम, १९५६ (१९५६का ४८) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३क की उपधारा (१) के आधीन जारी की गई भारत सरकार के पोत परिवहन, सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय, सड़क परिवहन और राजमार्ग विभाग की अधिसूचना संख्या का.आ.१४३४(अ) तारीख २६ मार्च २०२५ .जो भारत के राजपत्र, असाधारण, भाग-२, खंड-३, उपखण्ड (ii), में प्रकाशित की गई थी,द्वारा महाराष्ट्र राज्य रायगड जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या ५४८ अ कि.मी. ३३.२७ से कि.मी.४१.१८ (इंदापूर ते आगरदांडा) तक के भूखंड मे निर्माण (चौडाकरण/ ४- लेन का बनाना, आदि ) अनुरक्षण, प्रबन्ध और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए उस अधिसूचना से उपाबध्द अनुसूची में विर्निदिष्ट भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा की थी;

और उक्त अधिसूचना का सार उक्त अधिनियम की धारा ३ क की उपधारा (३) के अधीन १६/०४/२०२५ तारीख को “आपलं महानगर” और “रत्नागिरी टाइम्स” (मराठी) में प्रकाशित किया गया था ;

जबकी सक्षम प्राधिकारी को धारा ३-ग के तहत दायर आपत्ती प्राप्त हुई है,जिस पर विचार किया गया है और उसका उचित रूप से निपटान किया गया;

और सक्षम प्राधिकारी ने उक्त अधिनियम की धारा ३ घ की उपधारा (१) के अनुसरण में, केन्द्रीय सरकार को अपनी रिपोर्ट दे दी है;

अतः अब, केन्द्रीय सरकार, सक्षम प्राधिकारी की उक्त रिपोर्ट प्राप्त हो जाने पर और उक्त अधिनियम की धारा ३ घ की उपधारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए यह धोषणा करती है कि उक्त अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि का पूर्वोक्त प्रयोजन के लिए अर्जन किया जाना चाहिए ;

और अब केन्द्रीय सरकार, उक्त अधिनियम की धारा ३ घ की उपधारा (२) के अनुसरण में, यह घोषणा करताहू. कि इस अधिसूचना के राजपत्र में प्रकाशन पर उक्त अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि, सभी विल्लंगमों से मुक्त हो कर आत्यन्तिक रूप से केन्द्रीय सरकार में निहित हो जाएगी ।

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य के रायगड जिले मे राष्ट्रीय राजमार्ग संख्या ५४८ अ के कि.मी. ३३.२७ से कि.मी.४१.१८ (इंदापूर ते आगरदांडा) भूखंड के निर्माण लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण.

| **राज्य का नाम: महाराष्ट्र** | | | **जिले का नाम: रायगड** | | |
|---|---|---|---|---|---|
| **क्रमिक संख्या** | **सर्वेक्षण संख्या** | **भूमि का प्रकार** | **भूमि की प्रकृति** | **भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर में)** | **भूस्वामी/ हितबद्ध व्यक्तियों का नाम** |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **तालुक का नाम: मुरुड** | | | | | |
| **गांव का नाम: जमृतखार** | | | | | |
| 1 | १२६ | निजी | कृषी/शुष्क | 0.2 | रसिका चंद्रकांत पाटील, वैभव लक्ष्मण पारधी 126 p |
| | | | **Total** | **0.2** | |

[फा. सं. 12037/30/2017-MAH-P6/3D]

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/१४३/११९७/२०२५

शेख अमीनखान, निदेशक

# कर्जतमध्ये प्रभाग रचनेबाबत सहा हरकती, सूचना



**कर्जत : प्रतिनिधी**

एक वर्षापासून रखडलेल्या कर्जत नगर परिषद निवडणूक होऊ घातली आहे. निवडणूक आयोगाने इतर महत्त्वाच्या प्रक्रिया सुरू केल्यामुळे जानेवारी २०२६ मध्ये नगर परिषदेची निवडणूक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नगर परिषद प्रभाग रचनेचे काम झाले असून ही प्रभाग रचना अंतिम करण्यासाठी कर्जतकरांकडून १८ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालावधीत हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या होत्या. २०११ च्या जनगणनेनुसार कर्जत नगर परिषदेची लोकसंख्या २९ हजार ६६३ आहे, मात्र कर्जत नगरपरिषद हद्दीतून केवळ ६ हरकती आणि सूचना दाखल करण्यात आल्या होत्या.

प्रभागाच्या भौगोलिक सीमा बाबत १८ ऑगस्टपासून ३१ ऑगस्टपर्यंत म्हणजे १३ दिवसांतच केवळ सहा हरकती आणि सूचना आल्या होत्या. जिल्हाधिकारी यांनी सुनावणीसाठी कर्जतचे उपविभागीय अधिकारी, प्राधिकृत अधिकारी म्हणून प्रकाश संकपाळ यांची नेमणूक केली होती. याबाबत नगरपरिषद कार्यालयांमध्ये ही सुनावणी घेण्यात आली.

या वेळी कर्जत नगर परिषदेचे मुख्य अधिकारी तानाजी चव्हाण उपस्थित होते.

## PUBLIC NOTICE

**We, M/s Shikara Constructions Pvt. Ltd.** through its Director Mr. Ashok Banshiram Mehra, having **registered office** at 204: Bezzola Complex, Opp. Suman Nagar, Sion Trombay Road, Chembur, Mumbai 400071 & **Site office** at Survey NO. 67/2/1 at Village -Nere, Tahsil - Panvel, City/District - Raigad, hereby give following Public Notice for information;

We, M/s Shikara Constructions Pvt. Ltd. are the Owner & developer of the below mention Non- Agriculture land at Village Nere, Tal. Panvel, Dist Raigad which is duly registered in the records of the Grampanchayat Nere. The description of the land is as under :-

| Sr. No. | Property No. / Assessment No. | Area in Square Meter |
|---|---|---|
| 1 | 67/2/1 | 3073.28 sq. mtr. |

The Competent Authority (C.A.) i.e. The Associate Planner (NAINA) CIDCO has duly granted us permission to construct a building on the above mentioned land vide its letter No. **CIDCO/NAINA/PANVEL/NERE/BP-00670/CC/2023/0439** dated **1st Nov, 2023** & The competent Town Planner Nagar Rachana Niyojan Adhikari i.e. Associated Planner (NAINA) CIDCO has issued us the Commencement Certificate vide his letter No. **CIDCO/NAINA/PANVEL/NERE/BP-00670/CC/2023/0439** dated **1st Nov, 2023**. Accordingly, We hereby publish following description of our contraction project on the above mentioned land for the information of general public.

| | |
|---|---|
| Name and Address of the Developers | M/s Shikara Constructions Pvt.Ltd. Through Director Mr. Ashok Banshiram Mehra |
| Name and Address of the owner | 204 : Bezzola Complex: Opp. Suman Nagar : Sion Trombay Road : Chembur Mumbai 400071 |
| Name of the Contractor & Description of Property | M/s Suresh Patel (SRV Constrution) 303, Hill View society, Plot.no 50, Sector 6, Karanjade, Panvel - 410206. |
| The Order No. & Date of Grant of Permission Letter | CIDCO/NAINA/PANVEL/NERE/BP-00670/CC/2023/0439 |
| The Order No. & Date of the Commencement Certificate | CIDCO/NAINA/PANVEL/NERE/BP-00670/CC/2023/0439 |
| Approved Floor Space Index (FSI) | Approved FSI- 1.00 |
| Total No. Flats and their Total Approved Area | The Permission has been granted of 56 Flats to be constructed. Total construction area is 2970.979 Sq. Mtr. (Built-up) |
| Address of the Place where approved Maps & Documents are available for verification | Survey NO. 67/2/1 at Village -Nere, Tahsil - Panvel City / District - Raigad |
| Name of the Architect | M/s Swapnil Kalyankar, Architects Mr. Swapnil Kalyankar |
| Name of the Structural Engineer | M/s Prapti Associate Mr.Ram V. Marathe |

Place : Panvel
Date : 05/09/2025

**Sd/-**
M/s Shikara Constructions Pvt.Ltd. through its Director Mr. Ashok Banshiram Mehra

# पनवेलमध्ये रस्ते दुरुस्ती कामाला वेग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेतर्फे पनवेल प्रभागातील रस्ते दुरुस्तीच्या कामांना मोठ्या प्रमाणावर सुरूवात झाली आहे. नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी बांधकाम विभागाला वेगाने कामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत.





महापालिका आयुक्तांनी बांधकाम विभागाला रस्ते दुरूस्तीबाबत तातडीने कारवाई करण्याच्या सूचना आहेत. त्याप्रमाणे गेल्या काही दिवसांपासून महापालिका कार्यक्षेत्रातील तीनही प्रभागाप्रमाणे पनवेल प्रभागातील रस्त्यांवरील खड्डे बुजविणे व डांबरीकरणास सुरूवात झाली आहे. पनवेल शहरातील कापड गल्ली, नवीन पनवेल, आदई तलाव, डी मार्ट रोड, स्टेशन रोड, गणेश मार्केट रोड, खांदा कॉलनी सिग्नल ते हायवे पर्यंतचा रस्ता अशा विविध ठिकाणी रस्ते दुरुस्तीचे काम वेगाने सुरू आहेत तसेच रस्ते दुरुस्तीचे काम करताना धूळ उडून नये यासाठी पाण्याची फवारणी केली जात आहे.

आयुक्तांच्या सूचनेनूसार पनवेल महापालिकेच्या वतीने शहरातील रस्ते दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहेत. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व शहर अभियंता संजय कटेकर प्रत्यक्ष पाहणी करून कामांची सातत्याने माहिती घेत आहेत. नागरिकांची गैरसोय होऊ यासाठी तातडीने व नियोजनबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश कनिष्ठ अभियंत्यांना देण्यात आले. महापालिकेच्या बांधकाम विभागाने प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र कनिष्ठ अभियंते नियुक्त केले असून, त्यांच्या देखरेखीखाली रस्ते दुरुस्तीची कामे वेगाने पार पाडली जात आहेत.

या कामांच्या कालावधीत काही ठिकाणी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी संयम बाळगावा व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र सरकारची शीख समाजाबाबत ऐतिहासिक पावले -जसपालसिंह सिद्धू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र शीख समाजाच्या ११ सदस्यीय वेल्फेअर कमिटीचे प्रमुख भाई जसपालसिंह सिद्धू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नरीमन पॉइंट, मुंबई येथील 'भारत रत्न' राजीव गांधी इन्स्टिट्यूट येथे भेट घेतली. या भेटीत शीख समाजाच्या अग्री बंजारा, लबाना आणि सिक्खलिंगायत बंधूंबाबत संबंधित भटक्या जातीच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले.

या वेळी भाई हरनामसिंह खालसा, हॅपी सिंग सदस्य महाराष्ट्र राज्य अल्पसंख्य आयोग आदी उपस्थित होते. सर्वांनी मिळून उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार केला आणि आभार मानले. भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी शीख समाजाशी निगडित विविध प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेतली.

भाई जसपालसिंह सिद्धू यांनी सांगितले की, ही भेट केवळ विकास व कामकाजापुरती मर्यादित नव्हती, तर महाराष्ट्र शीख समाजाच्या प्रगतीसाठी ऐतिहासिक ठरली आहे. त्यांनी पुढे सांगितले की, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या सहकार्यामुळे लबाना आणि सिक्ख लिंगायत समाजाच्या आरक्षणासंबंधीच्या समस्या सुटल्या आहेत. समाजाच्या हितासाठी घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयामुळे भावी पिढ्यांना शिक्षण, नोकरी आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.

ते पुढे म्हणाले की, ही केवळ सुरुवात आहे. महाराष्ट्र शीख समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आम्ही वचनबद्ध आहोत. त्यांनी विशेषत: हे अधोरेखित केले की, २०२४पासून महाराष्ट्र सिख समाजाच्या गरजा व प्रश्न सोडविण्यासाठी कार्यवाही गतीमान होईल.

## शैक्षणिक शिष्यवृत्तीच्या अर्जास १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रात इयत्ता पहिली ते महाविदयालय शिक्षण घेत असलेल्या 'विविध घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती वितरण करणे' या योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते.



या विविध घटकाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेसाठी लाभार्थी नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावयाची प्रथम मुदत २० जून २०२५ ते ३१ जुलै २०२५पर्यंत होती. त्याचप्रमाणे विहीत नमुन्यातील ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्याचा अंतिम १५ ऑगस्ट २०२५रोजी पर्यंत होता.

त्याचप्रमाणे लाभार्थी नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावयाची व्दितीय मुदत देण्यात येऊन ती १५ ऑगस्ट २०२५पर्यंत व विहीत नमुन्यातील ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यास ३१ ऑगस्ट २०२५पर्यंत कालावधी देण्यात आलेला होता. तथापि, स्थानिक नागरिक, लोकसेवक तसेच विदयार्थ्यांमार्फत करण्यात येणारी मागणी विचारात घेऊन या योजनेंतर्गत लाभार्थी नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावयाची अंतिम मुदत १५ सप्टेंबर २०२५पर्यंत तसेच विहीत नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यास ३० सप्टेंबर २०२५ रोजीपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेकरिता यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नाही, असे सूचित करण्यात येत आहे. या शिष्यवृत्ती योजनांचा महानगरपालिका क्षेत्रातील गरजू लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई मनपातर्फे करण्यात येत आहे.

## विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करायला शिकवा -विवेक सावंत

**नवी मुंबई : बातमीदार**



पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक परिसंवादात एमकेसीएलचे चीफ मेंटॉर विवेक सावंत यांनी सर्व उपस्थितांना विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा सल्ला दिला.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा अंमलबजावणी या विषयावर हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यात एमकेसीएलचे चीफ मेंटॉर विवेक सावंत तसेच शिक्षण विकास मंचाचे मुख्य समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी आणि एमकेसीएलचे जनरल मॅनेजर अमित रानडे यांनी मार्गदर्शन केले. या परिसंवादात मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील शिक्षकांनी व शिक्षणप्रेमींनी सहभाग घेतला.

सावंत यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचा गाभा समजून सांगितला. मुलांना मशीन बनवू नका, त्यांना विचार करायला लावणारे प्रश्न विचारा, बहुविद बुद्धिमत्ता विकास करण्यासाठी विविध उपक्रमात सहभाग घ्यावा, एकमेकांतील भावभावना समजून घ्यायला शिकवा, असा सल्ला विवेक सावंत यांनी दिला.

अमित रानडे यांनी क्लिक कोर्सेस विषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये निर्माण करण्यासाठी ते उपयुक्त होतात, त्यांचा घरी तसेच शालेय शिक्षणात वापर केला जावा असे मत व्यक्त केले. डॉ. माधव सूर्यवंशी यांनी राज्य अभ्यासक्रम आराखडयातील सर्व बारकावे, शक्यता व्यक्त केल्या. अभ्यासक्रमातील आंतरसमवाय क्षेत्रे, सहसंबंध, मूल्यमापन पद्धती, बोर्ड परीक्षा, शिक्षकांनी घ्यावयच्या दक्षता, अंमलबजावणी करताना आवश्यक बदल, शालेय संस्कृती तसेच भाषा आणि इतर विषयात होऊ घातलेल्या बदलांची थोडक्यात माहिती दिली.

या कार्यक्रमास पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, शिक्षण तज्ञ शैलजा मुळ्ये, एमकेसीएलच्या डेप्युटी जनरल मॅनेजर क्रांती पाटील, समाजसेविका तेजस्विनी अधिकारी, शिक्षण विकास मंचाचे संस्थापक सल्लागार दत्ता बाळसराफ, योगेश कुदळे, समन्वयिका शुभांगी जाधव, मुख्याध्यापक रवींद्र पाटील, प्रदीप पाटील, सुनील पाटील, मधुकर वारभुवन, विद्या वाघ, मीनल भोळे व अनेक शाळांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## स्व. विराज म्हात्रेच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांसाठी एक लाखाची एफडी

**उरण : प्रतिनिधी**

उरण पंचायत समितीच्या निवृत्त कर्मचारी श्रीमती साधना काशिनाथ म्हात्रे यांनी आपले सुपुत्र, स्वर्गीय विराज काशिनाथ म्हात्रे याच्या स्मरणार्थ चिरनेर येथील प्राथमिक केंद्र शाळेच्या विद्यार्थ्यांना अभ्यासात प्रोत्साहन देण्यासाठी आणि यातून त्यांच्या गुणांचा सत्कार करण्यासाठी प्राथमिक केंद्र शाळा चिरनेरच्या विद्यार्थ्यांसाठी एक लाख रुपयांचे फिक्स डिपॉझिट ठेवण्यात आले आहेत.




यात वार्षिक परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच शाळेतील अन्य विद्यार्थ्यांच्या बक्षीसासाठी ही रक्कम वापरण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

या त्यांच्या उदार दातृत्वमुळे दरवर्षी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करणे शक्य होणार आहे, ज्यामुळे त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळेल. या त्यांच्या कृतीने केवळ आर्थिक मदतच मिळाली नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी एक प्रेरणादायी आदर्शही निर्माण झाला आहे. या त्यांच्या उदात्त योगदानाबद्दल प्राथमिक शाळेच्या शिक्षकांबरोबर शाळा समिती व विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक विश्वनाथ गावंड यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते मंगेश केणी, उपशिक्षक बळीराम पाटील तसेच शाळेचे अन्य शिक्षक उपस्थित होते.

## गौरा गणेशोत्सव







पनवेल : गौरा गणेशोत्सवानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी सुकापूर आणि तळोजा परिसरात विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. सुकापूर येथील दिवेश भगत, ज्ञानेश्वर पाटील, एकता मित्र मंडळ, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, उदय म्हसकर सुकापूरचा राजा तसेच भगतवाडी येथे कार्तिक भगत; तळोजा पेठाली येथे प्रल्हाद केणी; खारघरमध्ये शिवप्रतिष्ठान सामाजिक संस्था व माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांच्या गौरा गणपतीचे दर्शन अरुणशेठ भगत यांनी घेतले. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, प्रभाकर जोशी, विभागीय अध्यक्ष सुनील माळी, तालुका चिटणीस यतीन पाटील, जगदीश भगत, कर्तिक भगत, शुभ पाटील आदी उपस्थित होते.















# कर्जतमध्ये अघोरी कृत्य, मारहाणीचा निषेध



## आरोपीवर पोलिसांत गुन्हा दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील हालिवली आदिवासीवाडी येथील स्मशानभूमीत दोन महिन्यांपूर्वी जादूटोणा व अघोरी कृत्याला आदिवासी बांधवांनी विरोध दर्शविला होता. याबाबतची तक्रारही पोलीस ठाण्यात दाखल झाल्याने त्यांचा डाव फसला. या घटनेचा राग मनात धरून असा प्रकार करणाऱ्याने एका आदिवासी युवकाला मारहाण केली. त्यामुळे आदिवासीनी संताप व्यक्त करीत पोलीस ठाणे गाठले. त्यानंतर मारहाण करणाऱ्या व्यक्तीवर अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट, अंधश्रद्धा जादूटोणा, अघोरी कृतीसंदर्भात गुन्हा दाखल केला.

११ जुलै २०२५ रोजी हालिवली गावातील ग्रामस्थ राजेश गोपाळ शिंदे व त्याचे साथीदार येथील स्मशानभूमीमध्ये जादूटोणा व अघोरी कृत्य करीत होते. त्यांना आदिवासी बांधवांनी विरोध दर्शविला तसेच याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्याने राजेश शिंदेचा डाव फसला होता. हा राग मनात धरून जादूटोणा अघोरी कृत्याला विरोध करणाऱ्या विष्णू गणपत वाघमारे या युवकाला रस्त्यात गाठून जबर मारहाण करण्यात आली.

या घटनेची माहिती मिळताच आदिवासी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा आदिवासी विकास परिषदेचे कोकण प्रदेशाध्यक्ष मालू निरगुडे, बिरसा ब्रिगेडचे जिल्हा अध्यक्ष अनंता वाघमारे, सचिव सचिन वाघमारे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दिलीप डाके, खालापूर तालुका कमिटीचे अध्यक्ष नारायण निरगुडे, सचिव रवी बांगारे, सहसचिव राजू सुतक, देहू दरवडा, तुळशीराम कवठे, अनिल पारधी, संजय पवार, रवी पवार, अविनाश वाघमारे, शंकर वाघमारे, नितीन पवार, इत्यादी समाज संघटनेचे पदाधिकारी व आदिवासी समाज मोठ्या संख्येने कर्जत पोलीस ठाण्यात गेला. तेथे या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. त्यानंतर कर्जत पोलीस ठाण्यात राजेश शिंदे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.



## नागोठण्याजवळ बसचा अपघात; चालक जखमी

**नागोठणे : बातमीदार**

मुंबई-गोवा महामार्गावर मुंबईकडून पोलादपूरला जाणारी प्रवासी बस (एमएच ०४ एमएच ९४९३) नागोठणेजवळील पाटणसई गावाजवळील पुलाच्या डिव्हायडरवर चढून अपघात झाला. या अपघातात चालक किरकोळ झाला असून त्याच्यावर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले.

सपोनि सचिन कुलकर्णी रात्रगस्त करीत असताना घटनास्थळी पोहचून गाडीचालक अभिषेक घाटे यांना रुग्णालयात रवाना करून क्रेनच्या सहाय्याने ट्रॅव्हलर बस बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत केली.

# मोकाट जनावरांचा श्रीवर्धनमध्ये उच्छाद

## धावता घोडा धडकून तरुण जखमी



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात मोकाट जनावरांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. घोडे व गुरांच्या मोकाट संचारामुळे नागरिकांच्या जीवितासह पर्यटकांच्या सुरक्षिततेलाही मोठा धोका निर्माण झाला आहे. दोन दिवसांपूर्वी भट्टीचा माळ बसथांब्याजवळ सलमान दिवेकर या तरुणाला मोकाट घोड्यामुळे गंभीर अपघात झाला. रस्त्याच्या मधोमध अचानक घोडा धावत आल्याने हा अपघात घडला असून जखमी तरुणाला तातडीने पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

या धडकेत घोड्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात असले तरी अपघातानंतर घोडा रातोरात ठिकाणावरून गायब करण्यात आल्याने यामागचे गूढ अधिकच गडद झाले आहे.

श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दांडगुरी-बोरली मार्ग, म्हाबदे घाट परिसर तसेच समुद्रकिनारी मोठ्या प्रमाणात घोडे मालक आपले घोडे आणून ठेवतात. दिवसभर पर्यटकांकडून घोडेस्वारी व घोडागाडीची सेवा दिल्यानंतर हेच घोडे सायंकाळी मोकाट सोडले जातात. परिणामी रस्त्यावर अचानक धावणारे घोडे अपघातांना आमंत्रण देत आहेत. काही दिवसांपूर्वी एका पर्यटकाच्या गाडीला घोडा धडकल्याचा प्रकार घडला होता. त्या वेळी पर्यटकाकडूनच उलट घोडे मालकांनी पैसे वसूल केले होते. यामुळे पर्यटकांमध्येही नाराजी आहे.

स्थानिक नागरिकांनी अनेकवेळा प्रशासनाकडे अर्ज करून, मोकाट घोडे व गुरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली, मात्र अद्याप कुठल्याही प्रकारची ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. उलट अपघातानंतरही घोड्याचा मालक कोण याचा मागोवा प्रशासनाने घेतलेला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप असून आणखी किती जीव गेल्यावर प्रशासन जागे होणार, असा सवाल विचारला जात आहे.

पूर्वी श्रीवर्धन नगर परिषदेच्या मालकीचा गुरांचा कोंडवाडा होता. नागरिक मोकाट जनावरे पकडून येथे जमा करत असत, परंतु या जागेवर नगर परिषद प्रशासनाने पर्यटक निवास उभारला आणि सध्या कोणत्याही प्रकारचा कोंडवाडा उपलब्ध नाही. त्यामुळे मोकाट जनावरांवर नियंत्रण ठेवण्याची सोयच उरलेली नाही. काही तरी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## ‘कोयना प्रकल्पग्रस्तांच्या नागरी सुविधांचे प्रस्ताव सादर करावे’

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील कोयना प्रकल्पग्रस्त वसाहतींच्या नागरी सुविधांचे परिपूर्ण प्रस्ताव तयार करून त्वरित सादर करावेत, असे निर्देश खालापूर गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी दिले आहेत.

कोयना जल विद्युत प्रकल्पामुळे सातारा जिल्ह्यातील विस्थापित कोयना प्रकल्पग्रस्तांच्या खालापूर तालुक्यात वसाहती आहेत. नागरी सुविधा, पर्यायी जमीन, नोकरी, प्रकल्पग्रस्त दाखले असे अनेक प्रश्न बाकी आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाबरोबर बैठक घेऊन काही निर्णय घेतले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समस्या सोडविण्यासाठी सूचना दिल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्यात येत असून नागरी सुविधांचे अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघ अध्यक्ष विठ्ठल मोरे, कार्याध्यक्ष अर्जुन कदम, सुरेश सकपाळ, अभियंता आगलावे, चव्हाण, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

# लोणेरे परिसरात स्मार्ट मीटर जनजागृती उपक्रम

**माणगाव : बातमीदार**

लोणेरे विभागाच्या वतीने गोरेगाव उपविभागात राबविण्यात आलेल्या कार्यक्रमात महावितरणचे उपकार्यकारी अभियंता अर्जून राठोड यांच्या निर्देशानुसार स्मार्ट मीटर जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. सहाय्यक अभियंता योगेश बढीया यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील कर्मचारीवर्गाने लोकांशी थेट संवाद साधून स्मार्ट मीटरचे फायदे आणि गरज याबाबत सविस्तर माहिती दिली.

या जनजागृती मोहिमेत लाईनमन केशव जांबरे, वायरमन सुरेंद्र शिर्के, रुपेश नलावडे, हर्षद सालदूर, सोमेश्वर काळस्पेपे, संकेत अंधेरे, भावेश धोंडगे, वृषभ पवार, प्रसाद धाडवे आदींनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी परिसरातील लोकांची प्रत्यक्ष भेट घेऊन स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया, त्याचे फायदे, वीजबचतीतील उपयोग, पारदर्शक बिलिंग प्रणाली आणि ग्राहकांना मिळणारी सुलभ सेवा याची माहिती दिली.

लोकांना समजावून सांगताना कर्मचारीवर्गाने पारंपरिक मीटरच्या तुलनेत स्मार्ट मीटरचे फायदे अधोरेखित केले. स्मार्ट मीटरमुळे विजेच्या वापराचे अचूक रेकॉर्ड मिळते, बिलिंगमध्ये पारदर्शकता राहते, तक्रारींना त्वरित प्रतिसाद मिळतो आणि ग्राहकांना त्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याची संधी मिळते याबाबत त्यांनी जनतेला जागरूक केले.



# शिक्षकांचा आदर होणे गरजेचे -एस.व्ही. पाटील

**चौक : प्रतिनिधी**

आई-वडील यांच्या इतकाच सन्मान गुरूजींना मिळाला पाहिजे, गुरू हेच आयुष्यातील खरे मार्गदर्शक आहेत. गुरूंचा सन्मान करणारे समाजात काम करण्यास पात्र ठरतात, असे उद्‌गार उद्योजक एस.व्ही. पाटील यांनी काढले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून राजू कापरेकर हे वडील दिवंगत विजय कापरेकर यांचा वारसा चालवत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक येथे शिक्षक व कर्मचारी यांचा गुणगौरव कार्यक्रम गेली ४१ वर्ष सातत्याने करत आहेत. विजय कापरेकर आता हयात नाहीत, परंतु हा गुणगौरव कार्यक्रम संचालक राजू कापरेकर यांनी सुरू ठेवला आहे. शिक्षक दिनाच्या वेळी गणपती सुट्टी असल्याने हा कार्यक्रम नुकताच घेण्यात आला.



या वेळी शिक्षक आणि कर्मचारी यांचा सन्मान भेटवस्तू आणि गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. संस्थेच्या कार्याध्यक्ष शोभा देशमुख यांनी संस्थेची शिक्षण क्षेत्रातील माहिती दिली. या संस्थेचा इ.१०वी व १२वीचा निकाल प्रगतिशील असल्याचे गौरव उद्‌गार माजी नगरसेवक मधुकर दळवी यांनी काढून शिक्षकांचे आचरण हे त्यांच्या शिक्षकी पेशाला साजेसे असावे, असे आवाहन केले.

शिक्षकांनी आपली कृती आणि उक्ती सारखीच असावी, असे आवाहन उपाध्यक्ष अ‍ॅड. अविनाश देशमुख यांनी केले. या वेळी कापरेकर परिवारासह सर्व शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

# नागोठणे ग्रामपंचायतीकडून पोलिसांचा सत्कार

## महिलेला जीवदान दिल्याबद्दल केले कौतुक

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या तत्परतेने आणि हवालदार महेश लांगी, स्वप्नील भालेराव व सुनील वाघ यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे नागोठणे रामनगर येथील महिला आशा दीपक गुंजाळ (वय २५) ही महिला घरगुती भांडणावरून अंबा नदीपात्रात उडी मारून स्वतःला संपविण्याचा प्रयत्न करीत असताना तिचा जीव वाचला. याची नागोठणे ग्रामपंचायतीने दखल घेऊन मंगळवार दि. ९ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायतीच्या सभागृहात सरपंच सुप्रिया महाडीक यांच्या हस्ते सत्कार करून पोलिसांचे कौतुक करण्यात आले.



या कार्यक्रमास पहिले लोकनियुक्त सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, उपसरपंच अकलाख पानसरे, ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, अ‍ॅड. प्रकाश कांबळे, वरिष्ठ लिपिक संतोष जोशी, तिरत पोलसानी, गुड्डू पोत्रिक, सज्जद पानसरे आदी उपस्थित होते.

आपल्या सत्काराबाबत नागोठणे ग्रामपंचायतीचे ऋण व्यक्त करून अधिक माहिती देताना पोलीस अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी सांगितले की, नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत २१ ऑगस्ट रोजी रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास एका महिलेने वरवठणे येथील जुन्या पुलावरून अंबानदीच्या पाण्याने भरलेल्या पात्रात उडी मारली अशी माहिती आम्हाला मिळाली. मी, हवालदार महेश लांगी, स्वप्नील भालेराव, सुनील वाघ यांनी महिलेला रस्सीच्या साहाय्याने पाण्यातून खेचून बाहेर काढून तिचे प्राण वाचविले व समुपदेशन करून पती दीपक गुंजाळ यांच्या ताब्यात दिले.

# रेवदंडा पोलीस ठाण्याच्या बाप्पाचे विसर्जन



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाणे येथील अनंत चतुर्दशीपर्यंत असलेल्या श्री गणेशाचे थाटात विसर्जन सोहळा सोमवारी (दि.८) सायंकाळी झाले.

प्रतिवर्षाप्रमाणे रेवदंडा पोलीस ठाणे येथे श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते. या उत्सवामध्ये पोलीस कर्मचारीवर्ग ऑन ड्युटीत वेळ काढून श्रध्दा व भक्तिभावाने गणेशाचे आरती, पूजा करतात. या मूर्तीची प्रतिष्ठापना पोलीस ठाणे आवारातील श्री दत्त मंदिर सभागृहात करण्यात आली होती. या वर्षी पोलीस ठाणे इन्चार्ज श्रीकांत किरविले यांचे मार्गदर्शनाखाली गणेशाचे आगमन गणेश चतुर्थीच्या दिवशी झाले होते. श्री दत्त मंदिराचे सभागृहात गणेशाची भव्य मूर्ती, सभोवती विद्युत रोषणाई व सुंदर सजावट करण्यात आली होती.

पोलीस ठाणे इन्चार्ज श्रीकांत किरविले यांचे हस्ते उत्तरपूजा पुरोहिताचे उपस्थितीत झाली. त्यानंतर पोलीस कर्मचारीवृंदाच्या उपस्थितीत पूजा, आरती घेण्यात आली. सायकांळी सहाचे सुमारास गणेश विसर्जन सोहळ्यास प्रारंभ झाला. या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले, मंगेश बाचकर यांचे मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने रेवदंडा पोलीस कर्मचारीवृंद विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले.

## धारकर कॉलेजला शासनाचे मानांकन

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर महाविद्यालयातील डिप्लोमा इन फार्मसी विभागास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे झालेल्या वार्षिक तपासणीनंतर उत्कृष्ट दर्जा प्राप्त झाला आहे. हे मानांकन शैक्षणिक व पायाभूत सुविधांतील प्रगतीला मिळाले आहे.

दरवर्षी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत विभागातील प्रशासनिक व शैक्षणिक नोंदींची सखोल तपासणी केली जाते. या वर्षीच्या तपासणीनंतर विभागाने सर्व निकषांवर उत्कृष्ट कामगिरी सिद्ध करत उच्चतम ग्रेड मिळवली. विभागाच्या या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता, प्रबंधन, प्राध्यापक वर्गाचे योगदान आणि विद्यार्थ्यांचा सहभाग अधोरेखित झाला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. मोहन काळे यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊवाटप

**माणगाव : बातमीदार**

नवनिर्माण मित्र मंडळ निवी यांच्या वतीने रोज ट्रॅव्हल्स ग्लोबल प्रा. लि.च्या हेमा सुरेश छबलानी यांच्या सहकार्याने स्कूल बॅग व इतर शैक्षणिक साहित्य आणि खाऊवाटप राजिप शाळा मुठवली तर्फे तळे व आदिवासी वाडी तसेच राजिप शाळा कशेणे व निवी अंगणवाडी, इतर मुलांना करण्यात आले.

इंदापूर विभागातील नवनिर्माण मित्र मंडळाची स्थापना २०१६मध्ये झाली असून या मंडळात मुंबई तसेच ग्रामस्थ तरुण नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. हे मंडळ सामाजिक बांधिलकी जपत असून आपल्या गावापुरता मर्यादित न राहता सर्वत्र माणगाव तालुक्यात तसेच इंदापूर विभागात सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रात काम करत आहे.

शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप कार्यक्रमाला नवनिर्माण मित्र मंडळाचे संस्थापक शांताराम बाबरे, अंबाजी जाधव, सल्लागार गणपत गायकर, शंकर जाधव, काशिराम वाघरे, उमाजी वाघरे, नारायण वाघरे, उमाजी जाधव, अध्यक्ष राकेश जाधव, उपाध्यक्ष खेळूराम वाघरे, सचिव मनेश बाबरे, उपसचिव प्रवीण जाधव, खजिनदार सुरेंद्र जाधव, संदेशवाहक शंकर वाघरे, सदस्य महेश बाबरे, समीर जाधव, नंदकुमार वाघरे, अतिश डिघे, शैलेश गायकर, नितेश वाघरे, अविनाश जाधव, निलेश गायकर, सतीश वाघरे, रूपेश गायकर, प्रकाश वाघरे, राजन वाघरे, केतन जाधव, संकेत जाधव, रामा वाघरे, अजय डिघे, दगडू वाघरे, चंद्रकांत वाघरे तसेच मुठवली शाळा व आदिवासीवाडी मुख्याध्यापिका नम्रता रेलेकर, विजया क्षीरसागर, उपशिक्षक सतीश निवळे, ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे सरपंच, वनिता जाधव, शाळा अध्यक्षा दिव्या राणे तसेच पालक उपस्थित होते. त्याचप्रमाणे राजिप शाळा कशेणे मुख्याध्यापिका अपूर्वा जंगम, शिक्षिका दिप्ती ढेपे, अंगणवाडी शिक्षिका शर्मिला कांरजकर, शाळा अध्यक्ष प्रकाश सायगावकर, कशेणे गाव अध्यक्ष शामकांत शिंदे, ग्रामस्थ गणपत शिंदे, हरिचंद्र शिंदे, तुकाराम शिंदे, आकाश भोसले, सागर मुंडे, बंटी शेठ, संजीव मोरे, अथर्व शेठ आदी उपस्थित होते.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव **लोना इंडस्ट्रीज एम्प्लॉइज को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. लाडवली, ता.पनवेल जि.रायगड,** असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. १२/०९/२०२५ ते १८/०९/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. १९/०९/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि. २३/०९/२०२५ ते ०७/१०/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २६/१०/२०२५ रोजी घेण्यांत येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०९/२०२५

**सही/-**
**(सुरेखा पाटील)**
निवडणूक निर्णय अधिकारी

# गौरा गणेशोत्सव


श्री साईनाथ मित्र मंडळ, पनवेल


चेंढरे ग्रामस्थ मंडळाचा गणपती, अलिबाग



श्री गणेश भाजी विक्रेते सामाजिक विकास मंडळाचा गणेश, अलिबाग


लाईन बॉईजचा राजा, अलिबाग




श्रीबागचा राजा गणेशोत्सव, अलिबाग (छाया : जितू शिगवण)


रामनाथचा राजा, अलिबाग


रेवदंडा मित्र मंडळाचा रेवदंड्याचा राजा


ठिकरूळ नाका मित्र मंडळाचा बाप्पा, अलिबाग


अभिनव मित्र मंडळ, पनवेल


श्री समर्थ मित्र मंडळ, पनवेल


राजेश पाटील, दिघोडे, उरण


साईनगरचा राजा, वावेघर, ता.पनवेल


उरण नगर परिषद कार्यालय


सार्वजनिक गौरा गणपती उत्सव मंडळ, श्रीगाव, अलिबाग


मयूर घरत व सोनिया घरत, दिघोडे, उरण











पेण शहरात अष्टविनायक मित्र मंडळ, मातोश्री मित्र मंडळ, ओरिजिनल अष्टविनायक, कौंडाळ तळ्याचा राजा, गुरुदत्त मिता मंडळ आदी ठिकाणी साखरचौथ गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. (छाया : इजाज मनियार)





रायगड जिल्ह्यात साखरचौथीच्या म्हणजेच गौरा गणेशोत्सवाची धूम सुरू आहे. दीड दिवसाच्या मुक्कामासाठी बुधवारी या गणपती बाप्पांचे आगमन झाले आहे. रायगड जिल्ह्याच्या उत्तर भागात हा साखरचौथ गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आता दक्षिण रायगडात काही भागातदेखील हा गणेशोत्सव साजरा केला जाऊ लागला आहे. गणेशोत्सवात अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या पहिल्या संकष्ट चतुर्थीच्या दिवशी गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. याला गौरा गणपती असेही म्हटले जाते. मुरूड बाजारपेठ मित्र मंडळाच्या वतीनेही गौरा गणपतीचे जल्लोषात आगमन होऊन त्याची प्रतिष्ठापना करण्यात आली.



सौजन्य : मयूरेश नेतकर, उपाध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा भाजपा

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com